सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १६ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जगातील एक प्रमुख सागरी शक्ती म्हणून भारताचा उदय : नरेंद्र मोदी

## पंतप्रधानांच्या हस्ते आयएनएस सुरत, आय एन एस निलगिरी व आय एन एस वाघशीर या युद्धनौकांचे राष्ट्रार्पण

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.१५ जानेवारी:

भारताला प्रदीर्घ सागरी प्रवास, वाणिज्य, नौदल संरक्षण आणि जहाजबांधणी उद्योगाचा समृद्ध इतिहास आहे. या समृद्ध इतिहासाचा आधार घेत आजचा भारत जगातील एक प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयास येत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केले.

मुंबईत नौदल डॉकयार्ड येथे नौदलाच्या तीन आघाडीच्या युद्धनौका, आय एन एस सुरत, आय एन एस निलगिरी आणि आय एन एस वाघशीर यांचे आज त्यांच्या हस्ते राष्ट्रार्पण करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार उपस्थित होते.

१५ जानेवारी हा दिवस लष्कर दिन म्हणून साजरा केला जातो .

या दिवशी भारताचा सागरी वारसा, नौदलाचा समृद्ध गौरवशाली इतिहास आणि आत्मनिर्भर भारत अभियानासाठी अतिशय महत्वपूर्ण असून छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय नौदलाला नवीन सामर्थ्य आणि दृष्टी दिली आहे, असे सांगून नरेंद्र मोदी म्हणाले,' एकविसाव्या शतकातील भारतीय नौदलाला सक्षम करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने छत्रपती शिवरायांच्या भूमीतच एक मोठे पाऊल टाकले आहे. अशा प्रकारे विनाशिका, फ्रिगेट आणि पाणबुडी यांचे एकाच वेळी राष्ट्रार्पण प्रथमच होत आहे, या सर्व आघाडीच्या युद्धनौकांची निर्मिती भारतात झाली असून ही अतिशय अभिमानस्पद गोष्ट आहे,

आजच्या कार्यक्रमाने आपला वैभवशाली वारसा आणि भविष्यातील आशा आकांक्षांना जोडले आहे, आज राष्ट्रार्पण करण्यात आलेली चोल साम्राज्याच्या सागरी पराक्रमाला समर्पित असलेली आय एन एस निलगिरी आणि गुजरातच्या बंदरांच्या मार्गे भारताला पश्चिम आशियाशी जोडलेल्या काळाची आठवण करून देणारी आय एन एस सुरत युद्धनौका यांचा उल्लेख त्यांनी केला. काही वर्षांपूर्वी कावेरी या पाणबुडीच्या जलावतरणानंतर झ७५ स्कॉर्पीन प्रकल्पाची सहावी पाणबुडी आयएनएस वाघशीरचे राष्ट्रार्पण झाले असून, या आघाडीच्या पाणबुड्यांमुळे भारताची सुरक्षा आणि प्रगती वाढीला लागेल, असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले,'आजचा भारत जगभरात विशेषतः ग्लोबल साऊथ मध्ये एक विश्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. भारत विस्तारवादाच्या नव्हे तर विकासाच्या भावनेतून कार्य करतो, भारताने नेहमीच एका मुक्त, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद प्रशांत क्षेत्राला समर्थन दिले आहे, किनारी भूप्रदेश असलेल्या राष्ट्रांच्या विकासाचा मुद्दा आल्यावर भारताने 'रिसरी' क्षेत्रातील सर्वांसाठी सुरक्षितता आणि वाढ हा मूलमंत्र सादर केला आणि या दृष्टीकोनाने प्रगती केली. भारताने आपल्या जी ट्वेंटी परिषदेच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात एक पृथ्वी, एक भविष्य या मंत्राचा प्रसार केला असे त्यांनी सांगितले.



कोविड-१९ विरुद्धच्या जागतिक लढाईदरम्यान भारताने अंगिकारलेल्या एक पृथ्वी, एक आरोग्य या दृष्टीकोनाचा उल्लेख त्यांनी केला . जगाला एक कुटुंब मानण्यावर भारताचा विश्वास आहे आणि यातूनच भारताने सर्वसमावेशक विकासाची आपली वचनबद्धता अधोरेखित केली. संपूर्ण क्षेत्राचे संरक्षण आणि सुरक्षा ही भारत आपली जबाबदारी मानतो,असे त्यांनी सांगितले.

भारतासारख्या सागरी किनारा लाभलेल्या देशांची जागतिक सुरक्षा, अर्थशास्त्र व भूराजकीय बदलांना आकार देण्यात असलेली महत्वाची भूमिका अधोरेखित करताना पंतप्रधानांनी सागरी सीमांचे रक्षण, दिशादर्शनातील स्वातंत्र्य,तसेच ऊर्जा सुरक्षा व आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या पुरवठा मार्ग व सागरी मार्गांचे रक्षण करण्याच्या महत्वावर भर दिला. दहशतवाद,अमली पदार्थांची व शस्त्रास्त्रांची तस्करी यांपासून सागरी मार्गांचे रक्षण करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी जोर दिला. जागतिक स्तरावर सर्व देशांनी सागरी मार्ग सुरक्षित व समृद्ध बनवण्यासाठी, दळणवळण अधिक कार्यक्षम करण्याची, तसेच नौवहन उद्योगाला अधिक सशक्त बनवण्याची गरज स्पष्ट केली. दुर्मिळ खनिजे व माशांसारख्या सागरी साठ्याचे प्रमाणाबाहेर किंवा गैरवापर थांबवण्यावर त्यांनी भर दिला. नौवहनाचे व सागरी वाहतुकीचे नवीन मार्ग शोधण्याच्या दृष्टीने भारत सतत प्रयत्नशील असल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले.हिंदी महासागर क्षेत्रातील त्वरित प्रतिसाद देणारा देश म्हणून भारताचा उदय झाला आहे. गेल्या काही महिन्यात भारतीय नौदलाने शेकडो जीव तर वाचवलेच शिवाय हजारो कोटी रुपये किमतीची आंतरराष्ट्रीय मालमत्ता वाचवली आहे. यामुळे भारताच्या नौदल व तटरक्षक दलांना विश्वासार्हता प्राप्त झाली आहे. भारताच्या हिंदी महासागरातील प्रभावामुळे आसियान देश, ऑस्ट्रेलिया, आखाती देश व आफ्रिकन देशांशी भारताचे आर्थिक सहकार्य वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या कार्यक्रमाचे लष्करी व आर्थिक अशा दोन्ही पैलूंच्या संदर्भात महत्व असल्याचे सांगून ते म्हणाले,'एकविसाव्या शतकात भारताच्छाकरे या लष्करी क्षमतांमधील वाढ व आधुनिकीकरण महत्वाचे आहे .जमीन, आकाश, खोल समुद्र अथवा अनंत अवकाश असो, भारताने सगळीकडे स्वतः चे हितरक्षण केलेच पाहिजे. संरक्षण दलाच्या प्रमुखांचे नवीन पद निर्माण करण्यासह अनेक सुधारणा सतत होत असून सशस्त्र सेनांना अधिकाधिक सक्षम बनवण्याकडे भारताचे प्रयत्न सुरु आहेत असे त्यांनी सांगितले.

भारताचे संरक्षण क्षेत्रातील उत्पादनाने रु.१.२५ लाख कोटीचा टप्पा ओलांडला असून देश आता १०० हुन अधिक देशांना संरक्षण उपकरणे निर्यात करत असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या संरक्षण क्षेत्रात येत्या काळात अधिक महत्वाचे बदल घडवण्यासाठी सरकार पूर्ण पाठिंबा देईल, अशी ग्वाही त्यांनी दिली

तीन प्रमुख लढाऊ नौकांचा नौदलात समावेश ही संरक्षण उत्पादनात आणि सागरी सुरक्षेत जागतिक अग्रणी बनण्याचे भारताचे स्वप्न साकारण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण झेप आहे.

आयएनएस सूरत ही झ१५इ मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक प्रकल्पातील चौथी आणि शेवटची नौका, जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अत्याधुनिक विनाशिकांपैकी एक आहे. यात ७५% स्वदेशी सामग्रीचा वापर करण्यात आला असून ती आधुनिक शस्त्रास्त्र सेन्सर पॅकेजेस आणि प्रगत नेटवर्क-केंद्रित क्षमतांनी सुसज्ज आहे.

आयएनएस निलगिरी, झ१७- स्टेल्थ फ्रिगेट या प्रकल्पातील पहिली नौका, भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोने डिझाइन केली असून त्यात टिकून राहण्याची वाढीव क्षमता, सीकीपिंग आणि शत्रूच्या नजरेस पडणार नाही अशी प्रगत वैशिष्ट्ये समाविष्ट केली असून ती पुढील पिढीच्या स्वदेशी युद्धनौकांची झलक दर्शवितात.

आयएनएस वाघशीर, झ७५ स्कॉर्पीन प्रकल्पातील सहावी आणि अंतिम पाणबुडी असून,या पाणबुडीची बांधणी भारताच्या वाढत्या कौशल्याचे द्योतक असून ती फ्रान्सच्या नेव्हल ग्रुपच्या सहकार्याने तयार करण्यात आली आहे.

## टॅक्सी-रिक्षा भाड्याचा टप्पा एक किलोमीटर करा : जनता दलाची मागणी

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १५ जानेवारी : सर्वसामान्य जनता महागाईने ग्रासली असून त्यामुळे कर्जाच्या विळख्यात अडकू लागली आहे. या पार्श्वभूमीवर टॅक्सी व रिक्षा भाड्यात वाढ करण्याची मागणी मान्य करू नये तसेच प्रवाशांचे हित विचारात घेऊन भाड्याचा पहिला टप्पा दीड किलोमीटर ऐवजी एक किलोमीटरने सुरू करावा, अशी मागणी जनता दल सेक्युलर मुंबई पक्षाने केली आहे.

टॅक्सी रिक्षाच्या भाड्यात वाढ करण्याची मागणी चालक-मालकांच्या संघटनानी केली आहे. परंतु अलीकडच्या काळात विशेषतः सीएनजीच्या दरात फार मोठी वाढ झालेली नाही. दुसरीकडे सामान्य माणूस महागाईमुळे मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे भाडेवाढीची मागणी सरकारने मान्य करू नये, असे पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. भाडेवाड करताना सरकारकडून नेहमीच प्रवाशांच्या हिताकडे दुर्लक्ष केले गेले आहे. मग तो वेटिंग चार्जेस लावण्याचा मुद्दा असो की रात्री जादा दराने भाडे आकरण्यास परवानगी देण्याचा प्रश्न असो. शासकीय यंत्रणांनी कायमच चालक मालकांना झुकते माप दिले आहे. त्यामुळे प्रवाशांच्या हिताचाही विचार व्हावा,प्रवासी, विशेषता: महिला एक किलोमीटर व त्यापेक्षा कमी अंतरासाठीही अनेकवेळा टॅक्सी रिक्षाचा वापर करतात.

## मकर संक्रांतीला ३.५० कोटी भाविकांनी केले अमृत स्नान

प्रयागराज: उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे आयोजित महाकुंभाच्या दुसऱ्या दिवशी आज, मंगळवारी तब्बल ३ कोटी ५० लाख भाविकांनी त्रिवेणी संगमात अमृत स्थान केले. यात १३ आखाड्यातील साधू-संत देखील सहभागी झाले होते.

यासंदर्भात उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्विटरवर (एक्स) जारी केलेल्या संदेशात सांगितले की, श्रद्धेचा भव्य संगम असलेल्या महाकुंभ मेळ्यात मकर संक्रांतीच्या शुभ प्रसंगी पवित्र संगमात श्रद्धेने स्नान करणाऱ्या सर्व पूजनीय संत, कल्पवासी



आणि भक्तांचे हार्दिक अभिनंदन, समानता आणि एकता. आज, पहिल्या अमृत स्नान महोत्सवात, ३.५० कोटींहून अधिक साधू-संत आणि भाविकांनी त्रिवेणी स्नानाचा पवित्र लाभ घेतला.

पहिल्या स्नानोत्सवाच्या यशस्वी पूर्ततेबद्दल, सनातन धर्मावर आधारित सर्व आदरणीय आखाडे, न्याय प्रशासन, स्थानिक पोलिस आणि प्रशासन, स्वच्छता कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि धार्मिक संस्था यांचे मनापासून आभार आणि अभिनंदन करीत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे. प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी पूर्ण कुंभ आयोजित केला जातो आणि जेव्हा १२ पूर्ण कुंभ असतात तेव्हा हा महाकुंभ १४४ वर्षांनी येतो. महाकुंभात स्नान करण्याची संधी खूप भाग्यवान लोकांना मिळते. महाकुंभाच्या निमित्ताने महानिर्वाणी आखाड्यातील ६८ महामंडलेश्वर आणि हजारो संतांनी अमृत स्नान केले.

## पंतप्रधान मोदीं गुरुजींनी महायुतीच्या मंत्री आमदारांना दिले धडे! दीड तास मार्गदर्शन!

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.१५ जानेवारी : मुंबईच्या दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महायुतीच्या मंत्री, आमदारांना तब्बल दीड तास मार्गदर्शन केले सरकारची कार्यपद्धती ,विकास कार्यक्रम राबविण्याबाबत मूलतंत्र दिला. नौदलाच्या अग्रे सभागृहात झालेल्या या मार्गदर्शन सोहळ्यात त्यांनी संघटन कौशल्य वाढवण्याबरोबरच अभ्यास दौरे करणे आणि विरोधकांना विकास कामातून उत्तर देण्यासाठी लोकप्रतिनिधीनी सदैव प्रयत्नशील राहिले पाहिजे, अशा सूचना दिल्या असल्याचे सांगण्यात आले.

## बाजार समिती भाडे करारनामा चौकशी; जिल्हा उपनिबंधकांनी दिले सहाय्यक निबंधकांना पत्र

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१५ जानेवारी - कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व जिनिंग प्रेसिंग भाडे करारनामा रद्द करणे व नविन भाडे करारनामा करणेसाठी दिलेली मंजूरी पत्राची चौकशी करून अहवाल देण्याचे पत्र छत्रपती संभाजीनगर जिल्हा उप निबंधक (सहकारी संस्था) यांनी सहाय्यक निबंधक (सहकार) यांना दिले आहे.

१० जानेवारी रोजी बाजार समिती उपसभापती व १२ संचालकांनी जिल्हा उप निबंधक (सहकार) यांना कन्नड बाजार समिती जिनिंग प्रेसिंग भाडे करारनामा रद्द करणे व नविन भाडे करारनामा मंजुरीपत्रास स्थगितीसाठी अर्ज दाखल केला आहे. या अर्जामध्ये सभापती यांनी सदर प्रस्ताव दाखल करताना संचालक मंडळाच्या नावाने खोटे ठराव तयार करुन कार्यालयाची दिशाभूल केली . प्रस्तावासोबत मूळ प्रोसिडिंगची लिखीत स्वरुपाची प्रत न जोडता खोटे ठराव तयार करून सदरची मंजुरी घेतली आहे. सभापती यांनी दिशाभूल करन प्रस्तावासोबत खोटे ठराव दाखल करुन बाजार समितीचे लाखो रुपयाचे नुकसान केले आहे. जिनिंग प्रेसिंग भाडे करारनामा रद्द करणे व नविन भाडे करारनामा करणेसाठी दिलेली मंजुरी पत्रास स्थगिती देण्याबाबत व मुळ प्रोसेडिंगची पाहणी करण्याची संचालक मंडळाने बहुमताने मागणी केली होती. यावर जिल्हा उपनिबंधक(सहकार) यांनी कन्नडचे सहाय्यक निबंधक (सहकार) यांना स्वतः कृषि उत्पन्न बाजार समितीस भेट देवून प्रस्तावाच्या अनुषंगाने मुळ व लिखीत स्वरुपात असलेल्या प्रोसिंडीगची तपासणी करण्यात करण्यात यावी. प्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल केलेली मुळ कागदपाची तपासणी व चौकशी करुन आपले अभिप्रायासह स्वयंस्पष्ट चौकशीचा अहवाल तात्काळ सबंधीत अर्जदार यांना कळवून प्रत जिल्हा उपनिबंधक कार्यालयास सादर करण्याचे पत्र दिले आहे.

## मार्क झुकरबर्ग ३ हजारहून अधिक कर्मचाऱ्यांना दाखवणार बाहेरचा रस्ता!



मुंबई : एआय आता प्रत्येक प्रगत क्षेत्रात पुढे चालला आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रातील नागरिकांना एआयचा चांगलाच फायदा होत आहे. परंतु दुसरीकडे एआय टेक्नोलोजीचा फटका देखील बसत चालला आहे. मेटा आता एआय-संचालित सेवा आणि इमर्सिव्ह डिव्हाइसेस तयारीच्या दिशेने पुढे जात आहे. त्यामुळे मेटामधील हजारो कर्मचाऱ्यांना नोकरकपातीचा फटका सहन करावा लागणार आहे.

मेटाचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअॅपची पेरेंट कंपनीने जवळपास ३ हजार ६०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची योजना आखली आहे. त्यामुळे असमाधानकारक कामगिरी करणाऱ्यांना कर्मचाऱ्यांना मार्क झुकरबर्ग बाहेरचा रस्ता दाखवणार आहेत.

दरम्यान, नोकरकपातबाबत मार्क झुकरबर्ग यांनी म्हटले की, हे वर्ष खूप कठीण असेल आणि आमच्या टीममध्ये सर्वोत्तम लोक असतील यात्री खात्री करण्यासाठी नोकरकपात जारी करणार आहे. तसेच नोकरकपातीमुळे प्रभावित झालेल्या कर्मचाऱ्यांना मोबदला दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांसाठी आर्थिक दंडाचे संकेत

मुंबई : महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना खूप चर्चेत आहे. लाडकी बहीण योजना महायुतीच्या विजयासाठी गेम चेंजर ठरली. त्यांनतर आता या योजनेबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून अपात्र महिलांना स्वतः हून नावे कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं सांगण्यात येत आहे.

महायुतीचं सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेत महिलांच्या अर्जाची तपासणी सुरु होणार असल्याची चर्चा होती. मात्र, फक्त तक्रारी आल्यास तुमच्या अर्जाची तपासणी केली जाईल, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं होत. त्यांनतर आता महिला व बालकल्याण विभागाने याबाबत माहिती दिली आहे.लाडकी बहीण योजनेत निकषात न बसणाऱ्या महिलांना एकतर स्वतः हून नाव बाद करा किंवा पैसे भरावेत, असं सांगण्यात आलं आहे. अपात्र असलेल्या महिलांना योजनेतून नाव कमी करावे किंवा महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षावर पैसे भरावेत, अशी सूचना महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी केली आहे.

लाडकी बहीण योजनेत लाभार्थ्यांना डिसेंबर महिन्याचा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. त्यानंतर आता जानेवारी महिन्याच्या हप्त्याची वाट महिला पाहत आहे.अशातच आता अपात्र लाडक्या बहिणींना स्वतः हून अर्ज बाद करण्यास सांगितले आहे.

दरम्यान, आता ज्या महिला निकषात बसत नाही त्यांनी नाव मागे घ्यावेत किंवा ती रक्कम दंडासहित वसून केली जाईल, असं वक्तव्य छगन भुजबळांनी केले होते. त्यानंतर अपात्र लाडक्या बहिणींना दंड भरावा लागणार असल्याची चर्चा सुरु होती.याआधी धुळ्यातील आणि पुण्यातील दोन महिलांनी अर्ज स्वतः हून बाद केले आहे.

## जिनिंगमध्ये कामगार महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि १५ जानेवारी पैठण तालुक्यातील बालानगर येथील दिपक जिनिंग मध्ये एका कामगार महिलेने गळफास घेऊन केली आत्महत्या सविस्तर माहिती अशी की बालानगर येथील दिपक जिनिंग मध्ये बाहेर राज्यातील काही कामगार जिनिंग मध्ये काम करत आहे या जिनिंग मध्ये महिला कामगार असुन ,रुनीदेवी रमन सहानी वय ३२ वर्ष रा वैशाली जिल्हा, बिहार या महिलेने सकाळी ११:३० वाजे दरम्यान जिनिंग मध्ये गळफास घेतल्याचे आढळून आले तिथे कामगार व नातेवाईक यांनी या महिलेस पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता या महिलेचा उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे, वैद्यकीय अधिकारी डॉ. निकीता जोंधळे यांनी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे या घटनेची नोंद एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्यात घेण्यात आली आहे तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## महिनाभरापासून रस्ता ठेवला खोदून, नागरिकांना मनस्ताप

तभा वृत्तसेवा

पैठण दि :- पैठण शहरातील फकीरवाडा ते सार्वजनिक बांधकाम कार्यालय या अडीचशे मीटरचा वक्फबोर्डच्या जागेतल्या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने हाती घेण्यात आले असून माऊली कन्ट्रक्शनच्या ठेकेदाराने रस्ता कामासाठी महिनाभरापासून हा रस्ता खोदून ठेवल्याने येथील नागरिकांना मोठी समस्या जाणवत आहे.

शिवाजी नागरी सहकारी बँक ते सार्वजनिक बांधकाम कार्यालय या अडीचशे मीटरच्या सिमेंट रस्त्यासाठी जवळपास एक कोटी रुपयांचा निधी मंजूर



झाला असून रस्ता उभारणीलाच या रस्त्याला दिरंगाईचे गालबोट लागले आहे. नेहमी रस्त्यावर नाली वाहणाऱ्या हा रस्ता आधी थातुरमातुर पध्दतीने खोदण्यात आला आणि नंतर पाईपलाईनचे काम म्हणून रस्ता तसाच सोडून देण्यात आला.परिणामी येथील नागरिकांना महिनाभरापासून वाहनाने काय पायी चालणे ही अवघड झाले आहे.याठिकाणी खड्यात पाय घसरून अनेक नागरिक जखमी सुद्धा झाले आहे. रस्ताकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता तनपुरे यांच्याशी संपर्क केला असता नपच्या पाईपलाईन कामासाठी रस्ताचे काम थांबले असून लवकरच हे काम सुरू होईल अशी माहिती दिली.



# छत्रपती संभाजीनगरमध्ये स्टार्टअप्ससाठी प्रचंड क्षमता आहे : ऋषी बागला

छत्रपती संभाजीनगर - जग वेगाने बदलत आहे आणि जागतिक अर्थव्यवस्थाही वेगाने बदलत आहे. आणि या वेगवान आणि गतिमान जगात, स्टार्टअप्सचे योगदान पूर्वीपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. उद्योगांना आकार देणाऱ्या, अर्थव्यवस्थांना सक्षम करणाऱ्या आणि राष्ट्रांचे आणि जगाचे भविष्य पुन्हा परिभाषित करणाऱ्या धाडसी कल्पनांना परिवर्तनात्मक उपायांमध्ये रूपांतरित करण्यात स्टार्टअप्स आघाडीवर आहेत. नवीन युगातील उद्योग म्हणून, स्टार्टअप्स केवळ तांत्रिक प्रगती चालवत नाहीत आणि स्पर्धात्मक उत्पादने प्रदान करत नाहीत तर शाश्वततेलाही खूप महत्त्व देतात.

भारत आता जगातील तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप हॉटस्पॉट आहे आणि सर्वात सक्रिय स्टार्टअप इकोसिस्टमपैकी एक आहे. भारतीय स्टार्टअप दृश्य १०० हून अधिक युनिकॉर्नसह नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या दिशेने प्रभाव पाडत आहे (स्रोत: पीआयबी). २०४७ पर्यंत भारत तिसरा सर्वात मोठा अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, स्टार्टअप्सची भूमिका अधिक महत्त्वाची ठरेल.

महाराष्ट्रातील स्टार्ट-अप इकोसिस्टम

लोकसंख्येच्या बाबतीत जपान आणि भूभागाच्या बाबतीत युनायटेड किंग्डम यांच्याशी तुलना करता येणारे महाराष्ट्र हे नेहमीच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचे प्रमुख इंजिन राहिले आहे. नोंदणीकृत स्टार्टअप्सच्या सर्वाधिक संख्येच्या बाबतीत ते भारतीय राज्यांमध्ये आघाडीवर आहे, २६,५२१.

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात जेव्हा आयटी क्षेत्र तेजीत होते तेव्हा महाराष्ट्रातील स्टार्ट-अप चळवळीला वेग आला. मजबूत धोरणात्मक पाठिंबा, सुलभ कर्ज उपलब्धता, जागतिक बाजारपेठांमध्ये दीर्घकाळापासून स्थापित प्रवेश, विविध प्रतिभा पूल, मजबूत पायाभूत सुविधा आणि अतुलनीय उद्योजकीय भावना यासारख्या अनेक घटकांमुळे ही वाढ झाली. महाराष्ट्राच्या दूरगामी विचारसरणीच्या धोरणांनी आणि नियामक चौकटीने मुंबई, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर, नाशिक आणि पुणे यासारख्या अनेक शहरांच्या वाढीला चालना दिली आहे, ज्यामुळे त्यांना उदयोन्मुख प्रादेशिक स्टार्टअप हब म्हणून स्थापित केले आहे. राज्यातील एकूण नोंदणीकृत स्टार्टअप्सपैकी मुंबई, पुणे आणि ठाणे यांचा वाटा जवळपास ६३% आहे. खरं तर, ग्लोबल स्टार्टअप इकोसिस्टम रिपोर्ट २०२४ नुसार, मुंबई आणि पुणे हे आशियातील टॉप ३० स्टार्टअप इकोसिस्टममध्ये अनुक्रमे १० आणि २६ व्या क्रमांकावर आहेत.

महाराष्ट्र स्टार्टअप पॉलिसी २०१८ ही राज्यातील एक भरभराटीची स्टार्टअप इकोसिस्टम आहे - जी देशातील सर्वोत्तमपैकी एक आहे. या धोरणामुळे राज्यातील स्टार्टअप्सना आर्थिक सहाय्य, कर सवलती आणि सवलती मिळतात. एक सरलीकृत नियामक चौकट, इनक्युबेशन सेंटर्सची उपलब्धता, मार्गदर्शन आणि नेटवर्किंग संधी आणि सहयोगी परिसंस्था तयार करण्यासाठी पाठिंबा यामुळे राज्याला स्टार्टअप्स क्षेत्रात अव्वल स्थानावर पोहोचण्यास मदत झाली आहे.

सोप्या नोंदणी प्रक्रिया, कर सवलती आणि नोकरशाहीच्या लाल फितीशाहीला कमी करण्यावर भर देऊन, महाराष्ट्राने नियामक प्रक्रिया सोप्या केल्या आहेत आणि उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे. व्यवसाय मालकांसाठी सुलभ आणि पारदर्शक कामकाजाची हमी देणारी राज्याची उत्कृष्ट कायदेशीर चौकट देखील या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. राज्यातील उद्योजकांच्या स्वप्नांना चालना देण्यासाठी वित्तपुरवठा सुलभ उपलब्धता महत्त्वाची ठरली आहे. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी (चडखपड) यासारख्या सरकारी योजना आणि उपक्रम स्टार्टअप्सना त्यांच्या आर्थिक गरजांसाठी मदत करत आहेत. राज्य सरकारने स्थापन केलेले इनक्यूबेटर आणि इनोव्हेशन सेंटर्स स्टार्टअप्सना त्यांच्या सुरुवातीच्या टप्प्यात मार्गदर्शन करतात आणि मार्गदर्शन आणि निधीच्या गरजा पूर्ण करतात. भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबई, व्हेंचर कॅपिटल (तउ), प्रायव्हेट इक्विटी (झए) आणि एंजल गुंतवणूकीचा एक मोठा भाग आकर्षित करते, जे स्टार्ट-अप्सना समर्थन देत आहेत. आघाडीच्या समूहांनी भागीदारी करारांद्वारे राज्यातील आशादायक स्टार्टअप्समध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजना - सन २०२४-२५ अंतर्गत

ई-निविदा सुचना क्रमांक: २२४ ते २३०/सन २०२४-२५

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकास योजना सन २०२४-२५ अंतर्गत ०७ कामाची ई-निविदा सुचना क्र. २२४ ते २३० सन २०२४-२५ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त. यांचे मान्यतेने)

स्वाक्षरी/-
शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

## संघ हीच जीवनगाथा



अलक (१४)

### स्वामी विवेकानंद यांना जीवनांजली

परमपूज्य डॉक्टर व स्वामी विवेकानंद या दोघांचीही आराध्य देवता भारत माता आहे. स्वामीजींनी मृत्यूच्या पंधरा वर्षे आधी रामकृष्ण मठाची स्थापना केली. डॉक्टरांनी आपल्या मृत्यूच्या पंधरा वर्षे आधी संघाची स्थापना केली. डॉक्टरजी व स्वामीजी हे दोघेही हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व या सत्याचे शोधक होते. दोघांचेही ध्येय राष्ट्रकल्याण हेच होते. त्यासाठी स्वामीजी म्हणत गर्वसे कहो मै हिंदू हूँ। डॉक्टरजी म्हणत माझी भारतमाता हिंदू राष्ट्र आहे. दोघेही त्यासाठी सतत प्रयासरत होते. सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी स्वामीजी धर्मवेत्ते; आचार्य; समाजसेवक; संतमहंत यांना भेटत होते. तर डॉक्टरजी लोकमान्य टिळक, सावरकर, सुभाषचंद्र बोस, तर कधी योगी अरविंद यांना भेटत होते. स्वामीजींचे संन्यासी दरिद्री नारायणाची सेवा करणारे भगवा वेषधारी आहेत. डॉक्टरजींचे संन्यासी म्हणजेच प्रचारक भारत मातेची सेवा करणारे शुभ्रवेषधारी आहेत. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी म्हणतात परमपूज्य डॉक्टर हेडगेवार यांनी संघकार्यार्थ आपल्या जीवनाची आहुती देऊन स्वामी विवेकानंदांना एक अनोखी जीवनांजली अर्पण केली आहे. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# मेडीकव्हर हॉस्पीटलमध्ये ३ रुग्णांचे यशस्वीपणे घटले वजन : डॉ. स्वरुप बोराडे

## लठ्ठपणामुळे होणाऱ्या वैद्यकीय, मानसिक परिस्थितीविरूद्ध उभे राहू या



छत्रपती संभाजीनगर : लठ्ठपण आणि लठ्ठपणाशी संबंधित आजार ही जागतिक समस्या बनली आहे. लठ्ठपणावर उपचार करण्यासाठी आवश्यकतेकडे लक्ष देत मेडीकव्हर हॉस्पिटलमध्ये बेरीॲट्रीक क्लिनीक डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात आले. गेल्या वर्षीत ३ रूग्णांनी वजन घटवून जीवन सुसह्य करण्यात यश मिळवले. तसेच मधुमेहाच्या औषधांपासून सुटकारा मिळाला. अशी माहीती बेरीट्रीक सर्जन डॉ. स्वरूप बोराडे यांनी सांगितले.

जानेवारी २०२३ मध्ये पहिली ३५ वर्षीय महिला दाखल झाली. त्या महिलेची उंची १५३ से.मी होती. तर १२५ किलो वजन आणि बीएमआय ५३.४ होते. तिला स्लीप एपनिया, दोन्ही गुडघेदुखी आणि काही पावले चालताना श्वाशोस्वासाचा त्रात होत होता. तिने अकरा महिन्यात ४६ किलोग्रॅम वजन कमी केले. सध्या त्या महिलेचे वजन ८० किलोग्रॅम असून तिला आता बरे वाटत असून स्लीप एपनिया आणि गुडघेदुखी कमी झाली आहे. त्यामुळे पुर्वीपेक्षा आता बऱ्यापैकी चांगल्या पद्धतीने चालू शकते.

दुसरा रूग्ण ४३ वर्षीय पुरूष होता. त्यांची उंची १७७ सेमी आणि वजन १४४ किलोग्रॅम होते. त्यात मधुमेहाचा आजार होता. शस्त्रक्रीयेनंतर तिसऱ्या दिवसापासून त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी सामान्य होती. आणि त्यांनी मधुमेहावरील औषधी बंद केली होती. त्यांनी सहा महिन्यात तब्बल ३२ किलो वजन कमी केले. आणि सध्या त्यांचे ११४ किलो वजन केले.

तिसरा रूग्ण ६४ वर्षीय महिला होती. तिचे वजन ९६ किलो तर उंची १६१.५ सेमी होती. बीएमआय ६३.८ होता. तिला गुडघेदुखी आणि चालताना श्वास घेणे कठीण होते. ती तिच्या गुडघ्यावर पडली त्यामुळे पुर्ण गुडघा बदलण्याचा सल्ला दिला. पण जास्त वजनामुळे तिला सांधे बदलण्याची शस्त्रक्रीया नाकारण्यात आली. तिच्यावर बॅरियाट्रीक सर्जरी झाली. आणि शस्त्रक्रियेनंतर ३ दिवसात तिची रक्तातील साखरेची पातळी सामान्य झाली. तीन महिन्यानंतर तिने २१ किलो कमी केले सध्या त्यांचे वजन ७५ किलो आहे. असे डॉ. बोराडे यांनी सांगितले.

काय आहे लठ्ठपणा

शरीरात वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात चरबी जमा होऊन आरोग्यावर जेव्हा विपरीत परिणाम होतात. त्याला लठ्ठपणा म्हटल्या जाते. लठ्ठपणा निश्चितपणे एक आजार आहे. इच्छाशक्तिच्या अभावाचा परिणाम असल्याचा मोठा गैरसमजही आहे. असे नसुन लठ्ठणपा एक जटिल आजार असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. फक्त आहार आणि व्यायामाच्या आधारे लक्षणीय वजन कमी करणे व टिकवणे कठीण असते.

बेरिॲट्रीक सर्जरी कोणावर व का

बेरिॲट्रीक सर्जरी तुमच्या पचनसंस्थेत बदल घडवून आणते. ज्यामुळे तुमचे वजन कमी होते. जेव्हा आहार व्यायाम वजन कमी करण्यात अयशस्वी ठरतात. तेव्हा बेरिॲट्रीक सर्जरी केली जावू शकते. बीएमआय ३५ किंवा ३० आणि सोबत मधुमेह, मॅटाबॉलिक सिंड्रोम असतांना लठ्ठपणामुळे श्वास घेण्यास त्रास होतो. झोपेत खुप घोरणाऱ्यांना दैनंदिन हालचालीत त्रास होतो. त्यांना हि शस्त्रक्रीया करता येते. हि चरबी वितळण्याची शस्त्रक्रीया नसुन लिपोसेक्शन ही चरबी वितळण्याची शस्त्रक्रीया आहे.

आयुष्य बदलवणारी शस्त्रक्रीया

बेरिॲट्रीक सर्जरी ही शरीरातील प्रत्येक प्रणाली आणि रक्तवाहीन्यांमधून चरबी उत्सर्जीत करण्यासाठी शरीरातील पेशींच्या स्तरावर कार्य करते आणि एकुण आरोग्य सुधारते. यातून टाईप २ च्या मधुमेहापासून मुक्तता मिळू शकते किंवा मधुमेहाचे औषधे कमी होऊ शकते. हृदयरोग रुग्णांना फायदा होऊ शकतो. अशी माहीती बेरिॲट्रीक सर्जन डॉ. स्वरूप बोराडे यांनी दिली.

## खरे दावे मंजूर करण्यासाठी मीशो त्यांच्या पुरवठा साखळी प्रक्रिया मजबूत करते

पुणे - मीशो, भारतातील एकमेव ट्रू ई-कॉमर्स मार्केटप्लेस ने त्यांच्या क्लेमांची प्रक्रिया बदलली आहे. विक्रेत्यांना सक्षम बनवण्याच्या आणि पारदर्शकता आणण्याच्या मीशोच्या वचनबद्धतेशी हे सुसंगत आहे. या बदलामुळे तक्रार निवारण आणि तपास प्रक्रियेला गती मिळेल आणि विक्रेते समुदायामध्ये पारदर्शकतेसह विश्वास निर्माण होईल. मे २०२४ पासून मीशोच्या क्लेमाच्या मंजुरी प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. आता बहुतेक प्रकरणांमध्ये तक्रार ७०% कमी वेळेत सोडवली जाते. या सुधारणेमुळे ३.४ दशलक्ष खरे दावे मंजूर झाले आहेत, ज्यामुळे विक्रेत्यांना जलद निराकरण मिळाले आहे. हे सर्व भागधारकांना अधिक कार्यक्षम आणि सहयोगी व्यासपीठ प्रदान करण्याच्या मीशोच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे. बनावट रिटर्न रोखण्यासाठी आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी मीशोने त्यांच्या पुरवठा साखळीत पडताळणी प्रक्रिया मजबूत केली आहे.

## अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा जाहीर

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) (डखण), ही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी जगभरात लोकप्रिय संस्था आहे. या संस्थेतर्फे सिम्बॉयसिस एंट्रन्स टेस्ट (डएढ) आणि एसआयटी इंजिनीअरिंग एंट्रन्स ट्रेस्ट २०२५ च्या माध्यमातून त्यांच्या अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांसाठी अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत. दोनदा संधी या नव्याने उपलब्ध झालेल्या सुविधेमुळे उमेदवारांना दोनपैकी सर्वोत्कृष्ट गुणांच्या माध्यमातून आपली कामगिरी अधिक चांगली करता येणार आहे. या परीक्षा ५ मे २०२५ आणि ११ मे २०२५ रोजी होणार आहेत आणि निकाल २२ मे २०२५ रोजी जाहीर होतील.सिम्बॉयसिस एंट्रन्स टेस्ट) आणि सिम्बॉयसिस इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी इंजिनीअरिंग एंट्रन्स एक्झाम) या एक तासाच्या कम्प्युटर आधारित प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची विविध विभागांमधील कौशल्ये आणि कल तपासला जातो. उमेदवारांना प्रत्येक परीक्षेसाठी दोन संधी मिळतात. ही परीक्षा सर्वत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने भारतातील ८० शहरांमध्ये घेतली जाते.

## लक्षावधी नागरिक आणि अनेक व्यवसायांसाठी इन्श्युरन्स इंडस्ट्री संकटमोचक ठरली

पुणे - श्री. तपन सिंघेल, चेअरमन, जनरल इन्श्युरन्स कौन्सिल आणि एमडी आणि सीईओ, बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स यांच्यामते आजवर लक्षावधी नागरिक आणि अनेक व्यवसायांसाठी इन्श्युरन्स इंडस्ट्री संकटमोचक ठरली आहे. ज्यांच्यावर अनेकदा आपल्या प्रयत्नांवर पाणी सोडण्याची वेळ आली होती. परंतु अलीकडील माध्यम वृत्तांमधून पुन्हा एकदा इन्श्युरन्स इंडस्ट्रीवर टीकेची झोड उठविण्यात आली आहे. यामुळे उचित प्रश्न निर्माण झाला आहे: सनसनाटीने तथ्यावर मात केली का? माध्यम वृत्तांवर बराच उहापोह झाला. आता वेळ आली आहे समस्येच्या सखोल आकलनाची आणि खरं वास्तव समजून घेण्याची. आईआरडीएआई च्या वार्षिक अहवालानुसार, गेल्या वर्षी जनरल इन्श्युरन्स इंडस्ट्रीने १.७२ लाख कोटी रुपयांचा क्लेम सेटलमेंट टप्पा पार केला. त्यापैकी जवळपास ८०,००० कोटी हून अधिक क्लेम रक्कम ही हेल्थ इन्श्युरन्स संबंधित होती. तरीही इंडस्ट्रीमुळे मिळालेल्या लाभाऐवजी गैरसमजाच्या कहाण्या सर्वांच्या कानी पडतात.

### जाहीर प्रगटन

मा.श्री- व्हि. डि. पाटील दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड, न्यायालय क्र. १ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज क्र. ३५१/२०२४
पु-ता. ०३/०१/२०२५

अर्जदार :१ भागिरथी भ्र. नामदेव जंजाळ वयः ५७ वर्षे, धंदाः शेती व घरकाम रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २ अरुणा भ्र. सुरेश भालकर वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३ अर्चना भ्र. भिमराव जाधव वयः ३२ वर्षे, धंदाः घरकाम रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ पल्लवी भ्र. गोरख चव्हाण वयः ३० वर्षे, धंदाः घरकाम रा. गोंडेगांव ता. नांदगांव जि. नाशिक. ५ प्रतिभा भ्र. ज्ञानेश्वर जाधव वयः २८ वर्षे, धंदाः घरकाम रा. हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६ सिमा भ्र. राजेंद्र चव्हाण वयः २४ वर्षे, धंदाः घरकाम रा. प्लॉट नं. १५ राधास्वामी कॉलनी हर्सुल ता. जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : १ महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन VIII 1827 चे कलम २ व ३ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार १ भागिरथी प्र. नामदेव जंजाळ वयः ५७ वर्षे, धंदाः शेती व घरकाम रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद.२ अरुणा भ्र. सुरेश भालकर वय: ३५ वर्षे, धंदाः घरकाम रा. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३ अर्चना भ्र. भिमराव जाधव वय: ३२ वर्षे, धंदाः घरकाम रा. वनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ पल्लवी भ्र. गोरख चव्हाण वय: ३० वर्षे, धंदाः घरकाम रा. गोंडेगांव ता. नांदगांव जि. नाशिक. ५ प्रतिभा भ्र. ज्ञानेश्वर जाधव वय: २८ वर्षे, धंदाः घरकाम रा. हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६ सिमा भ्र. राजेंद्र चव्हाण वय: २४ वर्षे, धंदाः घरकाम रा. प्लॉट नं. १५ राधास्वामी कॉलनी हर्मुल ता. जि. औरंगाबाद यांनी मा. न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि. जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडिल नामे नामदेव महादु जंजाळ हे होते त्यांचा मृत्यु दि. ०१/०४/२०२४ रोजी मौजे बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला होता. मयत नामदेव महादु जंजाळ यांस अर्जदार क्र. १ हि पत्नी व अर्जदार क्र.२ ते ६ असे मुली वारस आहेत. सदर मिळकती महसुल कार्यालयातुन अर्जदारांचे नावे नामनिर्देशित करणे कामी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदार क्र.१ ते ६ शिवाय इतर कोणीही कायदेशिर वारस नाही. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यंनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

दि. ३०/१२/२०२४

आदेशावरून

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

### मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १४/२०२५

अर्जदार : १ कमलबाई मधुकर शिंपी, वय ७५ वर्ष, धंदा-घरकाम, रा. भोई गल्ली, नगरदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगाव. २) अनिताबेन भूपेन्द्रभाई बाविस्कर, वय ५४ वर्ष, धंदा घरकाम, रा. सी/३/२७ कुंभनाय सोसायटी, अवकार हाल, अहमदाबाद सिटी, अहमदाबाद, गुजरात, ह. मु. प्लॉट न. १३७ सातपूर अंबड, लिंक रोड, चुंचाळे शिवार, भोर टाऊन शिप अंबड, नाशिक ३ जितेंद्र मधुकर शिंपी, वय- ५२ वर्ष, धंदा- खाजगी नोकरी, रा. प्लॉट न. १३७ सातपूर अंबड, लिंक रोड, चुंचाळे शिवार, भोर टाऊन शिप अंबड, नाशिक ४ मनीषा शाम जगताप, वय-५१ वर्ष, धंदा घरकाम रा. फ्लॅट न. ११ आनंद हाईटस गंगापूर रोड, होरीझान अकॅडमी जवळ दत्ता चौक, नाशिक ५ रवींद्र मधुकर शिंपी, वय- ४८ वर्ष, धंदा- मजुरी, रा. प्लॉट न. १३७ सातपूर अंबड, लिंक रोड, चुंचाळे शिवार, भोर टाऊन शिप अंबड, नाशिक

विरुध्द

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत मधुकर धनजी शिंपी है दिनांक १०/०२/२०२१ रोजी त्यांचा नाशिक, ता. जि. नाशिक. येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे कै. मधुकर धनजी शिंपी यांच्या गट क्र. ४९ मौजे पिंप्री अंतुर शिवार, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. मधील सामाईकरित्या नावे असलेल्या एक विहीरीच्या ०१ आर अर्ध्या हिस्स्याचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळावा. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत मधुकर धनजी शिंपी यांचे वारस असून त्यांना मयत मधुकर धनजी शिंपी यांच्या नावे असलेल्या वरील मिळकतीच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २७/०२/२०२५

आज दिनांकण १४/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

### मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २१७/२०२४

अर्जदार : १) ईश्वर पुंडलिक भदाणे, वय ५३ वर्ष, धंदा-मजुरी, रा. शिंदोळ, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) २) रवींद्र पुंडलिक भदाणे, वय ५० वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३ मालुबाई प्रल्हाद चव्हाण, वय- ४६ वर्ष, धंदा घरकाम, रा. शिरसगाव, ता. चाळीसगाव, जी. जळगाव

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत पुंडलिक ओंकार भदाणे हे दिनांक ०३/०८/२०१४ रोजी शिंदोळ, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत पुंडलिक ओंकार भदाणे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २९/०१/२०२५

आज दिनांक १५/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

### मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २१६/२०२४

अर्जदार : १) प्रमीलाबाई मुकुंदा अहिरे, वय- ५५ वर्ष, धंदा-घरकाम, रा. तितूर, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर २ बापू मुकुंदा अहिरे, वय- ३४ वर्ष, धंदा- मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३ राजेंद्र मुकुंदा अहिरे, वय- २८ वर्ष, धंदा- मजुरी, रा. वरीलप्रमाणे

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत मुकुंदा सोना अहिरे हे दिनांक २२/०७/२०२४ रोजी तितूर, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत मुकुंदा सोना अहिरे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/०१/२०२५

आज दिनांक १५/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र:- २७/२०२५.

अर्जदारः १) कमलबाई सुरेश पाटील, वयः- ५८ वर्षे, धंदाः- शेती. २) देवीदास सुरेश पाटील, वयः ३७ वर्षे, धंदाः शेती. वरील अर्जदार नं. ०१ व अर्जदार नं. ०२ रा. बनोटी ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ३) सौ. ज्योती हेमंत पाटील, वयः ३४ वर्षे, धंदाः घरकाम ४) सौ. दिपाली शामकांत पाटील, वयः ३१ वर्षे, धंदाः घरकाम वरील अर्जदार नं. ०३ व अर्जदार नं. ०४ रा. निंभोरा ता. भडगांव जि. जळगांव

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. कै. सुरेश दौलत खैरणार (पाटील) हे दिनांकः २०/०३/२०२४ ला मौजे टाकळी प्र. चा. ता. चाळीसगांव जि. जळगांव, येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- १७/०३/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः १५/०१/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क २८/२०२५

अर्जदार : १) निर्मलाबाई रामदास शिंदे, वय ६१ वर्षे, धंदा शेती २) गजानन रामदास शिंदे, ययः २७ वर्षे, धंदा शेती वरील अर्जदार नं. ०१ व अर्जदार नं. ०२ रा. निमखेडी ता. सोयगांव जि औरंगाबाद ३) सौ. मंगलाबाई विठ्ठल साकळे, ययः ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. पळासखेडा ता सोयगांव जि औरंगाबाद ४) सौ. सुमनबाई गणेश पाटील, वयः ३६ वर्ष, धंदा घरकाम, रा. डोंगरगांव ता. पाचोरा जि जळगाव ५) सौ. संगीता अरूण राऊतराय, वयः ३४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. निंबोरी बु ता पायोरा जि. जळगांव

// विरुध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे. कै. रामदास नारायण शिंदे हे दिनांक २०/०७/२०२४ ला मौजे निमखेडी ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- १८/०३/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक-१५/०१/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९/२०२५

अर्जदार : १. गोकुळप्रसाद रामदिनलाल जैस्वाल, वय ८४ वर्ष, धंदा-व्यवसाय, रा. पानवडोद बु, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर) २. मदनलाल गोकुळप्रसाद जैस्वाल, वय ६४ वर्ष, धंदा-व्यवसाय, रा. वरीलप्रमाणे. ३. सुदनलाल गोकुळप्रसाद जैस्वाल, वय ६२ वर्ष, धंदा-व्यवसाय, रा. गजानन मंदिराजवळ, सारंग हाउसिंग सोसायटी, प्लॉट न. १३, सेकंड फ्लोर, गारखेडा, औरंगाबाद. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत कुसुमबाई गोकुळप्रसाद जैस्वाल है दिनांक २९/११/२०२४ रोजी औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत कुसुमबाई गोकुळप्रसाद जैस्वाल यांचे वारस असून त्यांना मयत कुसुमबाई गोकुळप्रसाद जैस्वाल यांचा हक्क असलेल्या देशी दारू दुकानाचे country liquor shop C. L. III licence no.108 सी.एल.-३ अनुज्ञप्ती क्र. १०८ नावे करण्याची कार्यवाही करण्यासाठी व शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २५/२/२०२५

आज दिनांक १४/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

### मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २१८/२०२४

अर्जदार : १ दिलीप रघुनाथ देशमुख, वय ६६ वर्ष, धंदा-शेती, रा. किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर) २ बाळासाहेब रघुनाथ देशमुख (सोळुंके), वय ६४ वर्ष, धंदा-शेती, रा. वरीलप्रमाणे. ३ विलास रघुनाथ देशमुख, वय ४८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४ राजेंद्र रघुनाथ देशमुख, वय ६० वर्ष, धंदा शिक्षक निवृत्त रा. वरीलप्रमाणे. ५ रावसाहेब रघुनाथ देशमुख, वय-४६ वर्ष, धंदा शेती रा. भावशिंगपुरा रोड, आकाश अपा. वसुद्रा कॉलोनी, महेश नगर, औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर).

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रमाबाई रघुनाथ देशमुख हे दिनांक २२/०१/२०२० रोजी किन्ही, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत रमाबाई रघुनाथ देशमुख यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ३०/०१/२०२५

आज दिनांक १५/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/
जन्म-मृत्यु नोंद/सिआर-८१९
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : आरती ज्ञानेश्वर गोरे रा तळनेर पो घाटशेंद्रा ता कन्नड जि औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय तळनेर / दुधमाळ ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः आरती ज्ञानेश्वर गोरेच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः आरती ज्ञानेश्वर गोरेचा जन्म दिनांक १७-०९-२००६ रोजी तळनेर / दुधमाळ ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः आरती ज्ञानेश्वर गोरेचा जन्म दिनांक १७-०९-२००६ रोजी तळनेर / दुधमाळ ताः कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः आरती ज्ञानेश्वर गोरेचा जन्म दिनांक १७-०९-२००६ रोजी तळनेर । दुधमाळ येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १७-०९-२००६ रोजी तळनेर / दुधमाळ येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/
जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७४१
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : पंढरीनाथ तुळशीराम शेजवळ रा करंजखेड ज ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय घाटशेंद्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी खुशी पंढरीनाथ शेजवळच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी खुशी पंढरीनाथ शेजवळचा जन्म दिनांक १८-११-२०२० रोजी घाटशेंद्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी खुशी पंढरीनाथ शेजवळचा जन्म दिनांक १८-११-२०२० रोजी घाटशेंद्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी खुशी पंढरीनाथ शेजवळचा जन्म दिनांक १८-११-२०२० रोजी घाटशेंद्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा.

न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १८-११-२०२० रोजी घाटशेंद्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक ....../१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

# कृषी-पशुपालन यांची सांगड महत्वाची- डॉ.मणि

**परभणी,/प्रतिनिधी-:** शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. इंद्रमणि यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ०८ जानेवारी दरम्यान तीन दिवसीय अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची १९व्या आणि हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रमाची १२व्या राष्ट्रीय वार्षीक आढावा बैठकीचा यशस्वी समारोप ०८ जानेवारी रोजी झाला. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि, मुख्य अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के पी गोरे आणि सन्माननीय अतिथी म्हणून माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके हे होते. व्यासपीठावर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे माजी प्रमुख डॉ. वेणूगोपालन, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या हैदराबाद येथील भारतीय संशोधन संस्थेचे मुख्य शास्त्राज्ञ डॉ. के रमेश, हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जे.व्ही.एन.एस. प्रसाद,संशोधन संचालक डॉ. खिजर बेग आणि कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे मुख्यशास्त्राज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे आदींची उपस्थिती होती. बैठकीत अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या १९ शिफारशी तर हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रमाच्या ६ शिफारशी देण्यात आल्या. याचे सदरीकरण क्रीडाचे मुख्य शास्त्राज्ञ डॉ. के. गोपीनाथ यांनी केले. या शिफारशी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेस मंजुरीसाठी सादर केल्या जाणार असून या शिफारशींची चाचणी देशातील विविध ठिकाणच्या संशोधन केंद्राव्द्वारे केली जाणार आहे, अशी माहिती यावेळी दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले की, शेती उत्पादनासाठी पाण्याचा न्यायिक पद्धतीने उपयोग महत्ताचा असून कोरडवाहू शेतीमध्ये रबी आणि उन्हाळी हंगामात शेततळ्याचे अनन्य साधारण महत्व आहे. याबरोबरच कोरडवाहू शेतीतून तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळा जमिनीत पेरलेल्या बियाण्याची रक्कमेचा परतावा देखील मिळत नाही. शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल. शेतकऱ्यांना शेतीमधून किती नफा मिळतो याचा देखील संशोधन करताना विचार करणे आवश्यक आहे. संशोधन केंद्राने दिलेल्या संशोधनाचा प्रभावी परिणाम आणि समांतर प्रसारण महत्वाचे आहे. शेतकऱ्यांनी शास्वत शेतीसाठी स्वतः शेतीमध्ये उभे राहून शेती करणे महत्वाचे आहे. यातून त्यांना शेती व्यवसायाचे मूल्यांकन देखील करता येते. विद्यापीठ 'शेतकरी देवो भव:' या भावनेतून कार्य करत असून विविध विस्तार कार्याच्या माध्यमातून नियमित शेतकऱ्यांशी संवाद साधत आहे असे नमूद करून त्यांनी शेतीच्या उज्वल भविष्यासाठी कृषी आणि संलग्न



विभागातील सर्व शास्त्राज्ञांनी शेतकऱ्यांच्या नियमित संपर्कात राहावे व एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

डॉ. वेणूगोपालन म्हणाले की, हवामान बदलानुरूप शेती आणि पुनरुत्पादक शेती या दोन बाबी शेतीसंबंधी महत्वाच्या आहेत. याचा सर्व स्तरावरून उल्लेख केला जातो. या दोन बाबीवरच प्रामुख्याने कोरडवाहूसह सिंचित शेतीमध्येही संशोधन करून योग्य शिफारशी देणे महत्वाचे आहे. यासाठी तसेच पुढील पाच वर्षातील कार्य करण्यासाठी या बैठकीमधून प्राप्त शिफारशी लाभदायक ठरणार असल्याचे नमूद केले. डॉ. के रमेश यांना कोरडवाहू क्षेत्रात कार्य करणारे शास्त्राज्ञांची कार्य कौतुकास्पद असल्याचे बैठकीत जाणवले. शास्त्राज्ञ कोरडवाहू शेतीमध्ये एकादया डॉक्टर प्रमाणे योग्य वेळेस सल्ला देतात. याचा कोरडवाहू शेती विकास साधण्यास मदत मिळत असून कोरडवाहू शेती क्षेत्रात काम करण्यासाठी मोठा वाव आहे असे नमूद केले.

प्रास्ताविक संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी केले तर परभणी येथील कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची माहिती मुख्य शास्त्राज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. पपिता गौरखेडे, यांनी तर आभार हैदराबाद येथील क्रीडाचे मुख्य शास्त्राज्ञ डॉ. बी नर्सीम्लू यांनी मानले. बैठक यशस्वीतेकरीता मुख्यशास्त्राज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे तसेच प्रकल्पातील शास्त्राज्ञ, डॉ आनंद गोरे, डॉ. मदन पेंडके, डॉ. पपिता गौरखेडे, डॉ गणेश गायकवाड, डॉ. रावसाहेब राऊत यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तर विविध समित्यांचे अध्यक्ष व सदस्य यांनी आयोजनात मोठा सहभाग घेतला.

शास्त्राज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन ठेवून कार्य करावे....

दिवसेंदिवस जमिनीची प्रत खालावत चाललेली असून यामध्ये सुधार करणे आवश्यक आहे. जमिनीतील अन्नद्रव्य आणि मातीचे नुकसान दिवसेंदिवस होत आहे. भविष्यात एकूण जमिनीच्या तिसरा भाग शेती करण्यास योग्य राहणार नसल्याची शक्यता आहे. यासाठी मृद व जल संधारण केंद्रस्थानी ठेऊन संशोधन कार्यक्रम आखावा लागेल. यासोबतच हवामान बदलामुळे जमीन आणि पिकांच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम होत आहे. यामुळे सध्या उपयोगात असलेल्या तंत्रज्ञानामध्ये सुधार करण्यासाठी शास्त्राज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन समोर ठेवून भविष्यात कार्य करावे लागेल, असे मत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. पी. गोरे यांनी व्यक्त केले.

## संक्षिप्त वृत्त...

### ग्रामगीतेच्या माध्यमातून गावांचे परिवर्तन शक्य- डॉ.दिलीप शृंगारपुतळे

**परभणी,/प्रतिनिधी :** ग्रामगीता ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला दिलेली मोठी देण आहे. ग्रामगीतेच्या माध्यमातूनच गावांचे परिवर्तन होऊ शकते, असे प्रतिपादन ग्रामगीतेचे अभ्यासक डॉ. दिलीप शृंगारपुतळे यांनी केले.

येथील चतुरंग प्रतिष्ठान परभणीच्या वतीने बुधवार ८ जानेवारी रोजी सारंग स्वामी विद्यालयात आयोजित केलेल्या शालेय व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी अध्यक्षपदी सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धन्यकुमार शिवणकर तर प्रमुख उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक एन.व्ही. निलंगे, प्रा. कल्याण देशमुख यांची होती.

पुढे बोलतांना शृंगारपुतळे म्हणाले, समाजातील प्रत्योक समस्येवर ग्रामगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी उपाय सुचवला आहे. जर प्रश्न आपण निर्माण केलेले असतील तर त्याची उत्तरेही समाज म्हणून आपल्या जवळच आहेत म्हणूनच ग्रामगीतेत शासन नावाचा एकही शब्द आढळून येत नाही. आपण सर्वांनी एकत्र येऊन या सर्व प्रश्नांवर उत्तरे शोधायची आहेत. ग्रामगीतेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार अंगीकारल्यानेच गावांचे खरे परिवर्तन शक्य आहे, असे ते म्हणाले.

निकोप समाज निर्मितीसाठी शालेय विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. यासाठी चतुरंग प्रतिष्ठानची ही व्याख्यानमाला अत्यांत उपयुक्त असल्याचे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष धन्यकुमार शिवणकर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बी. एस. भिसे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### बनावट खरेदीखत प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**मानवत,/प्रतिनिधी :** महामार्गालगत जमीन नसताना बनावट खरेदीखत करून फसवणूक केल्याप्रकरणी मानवत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे आदेश येथील न्यायालयाने दिले आहेत.

नागनाथ कचरू जंगाले यांनी ॲड. सुनिल जाधव यांच्यामार्फत न्यायालयात एक तक्रार दाखल केली. यात बाळासाहेब दत्तात्रय देशमुख यांनी स्वतःची जमीन ही महामार्गालगत नसताना खोट्या चतूर्सिमा दाखवत साजिद अली मोहम्मद ताहेर अन्सारी, साजिद अली अब्दुल सलाम बेलदार यांना खरबा येथील शेत गट नंबर ५० जमीन ११ डिसेंबर २०२३ रोजी खरेदीखत क्रमांक २२४०/२०२३ प्रमाणे खोटे खरेदीखत करून दिली. त्याा साक्षीदार म्हणून गोपाळ नारायण भिसे, मुस्तफा दादामियाँ शेख, ज्ञानोबा लक्ष्मण कच्छवे यांनी स्वाक्षरी केली. यामुळे सदर इसमांना ही जमीन हायवे लगत नसतानाही बनावट खरेदीखत करून दिले. त्यामुळे जंगाले यांची फसवणूक झाल्याने त्यांनी मानवत येथील न्यायालयात तक्रार दाखल केली. तसेच मानवत रेल्वे स्टेशनच्या उड्डाणपुलाचे काम झाल्यानंतर शासनाने अधिग्रहण केलेला पुरावा व बाळासाहेब तसेच त्यांच्या आईची जमीन हायवे लगत नसताना खोटे खरेदीखत करून दिले. अशाप्रकारचा ॲड. सुनील जाधव यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपींविरुध्द येथील ठाण्यात ६ जानेवारी रोजी गुन्हा नोंद करण्याचा आदेश दिला. फिर्यादीच्या वतीने ॲड. सुनील जाधव यांनी काम पाहिले, त्यांना ॲड. संजय हजारे, ॲड. भूषण मोकाशे, ॲड. श्याम कुन्हाडे यांनी सहकार्य केले.

### श्री तुळजाभवानी शुगर प्रा लि आडगाव दराडेचे- १ लाख मेट्रिक टन गाळप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि. साखर



कारखान्याने चालू गळीत हंगामात १ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप पुर्ण केले आहे. कारखान्याकडून १० जानेवारी पर्यंत १ लाख मेट्रिक टन गाळप झाले आहे. गळीत हंगाम २०२४- २०२५ साठी गाळप क्षमतेचा विस्तार करून शेतक-यांचा ऊस वेळेत गाळपासाठी कारखान्याकडे यावा यासाठी आवश्यक सर्व यंत्रणा कार्यरत आहे. साखर व अन्य उपपदार्थ निर्मितीमधून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्यासाठी प्रयत सुरू असून श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि कारखान्याकडे आपला ऊस गाळपासाठी पाठवावा, असे आवाहन चेअरमन सौ भावनाताई बोर्डीकर यांनी केले आहे.

### मानवत येथील संशोधन प्रकल्पाची कुलगूरु यांच्याकडून झाली पाहणी

**मानवत,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत जर्मन एजन्सी जीआयझेड, सन सीड प्रायव्हेट लिमिटेड आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार या संस्थाच्या संयुक्त विद्यमाने ग्री-फोटोव्होल्टेईक तंत्राज्ञान विकास व संशोधना करिता परभणी जिल्ह्यामध्ये मानवत जवळ ग्री-फोटोव्होल्टेईक संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाला ९ जानेवारी रोजी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि यांनी भेट देवून पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, वनस्पती जनुकीय विभागाचे प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे होते. या भेटी दरम्यानग्रीपीव्ही संशोधन प्रकल्पा मार्फत राबविण्यात आलेले पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या व इतर संशोधनातील केळी, तुर, जवस, हरभरा, घेवडा, साळ, झुकेनी,कांदा, कोबी, या विविध पिकांवर नव्याने प्रयोग राबविण्यात आलेले आहेत त्याची पाहणी केली. त्यांनी प्रकल्पाच्या शास्त्रजज्ञासोबत चर्चा करून संशोधनाबाबत मार्गदर्शन केले. ग्री पीव्ही संशोधन प्रकल्पामध्ये चालु असलेल्या संशोधना बद्दल समाधान व्यक्त केले. शेतीचा मोलाचा वाटा राहणार असे बोलून प्रकल्पातील सर्व शास्त्राज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांना प्रोत्साहन दिले व भविष्यामध्ये ग्रीपिव्ही प्रकल्प असेच कार्य करत रहावे यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान डॉ. गोदावरी पवार, डॉ विक्रम गुळवे, डॉ. सुनिता पवार, डॉ. बी एम कलालबंडी,जीआय झेडचे श्री अभिषेक शास्त्री तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/




# त्या अपहार प्रकरणी आरोपीस सोमवारपर्यंत पोलिस कोठडीचे आदेश

**पूर्णा,/प्रतिनिधी :** येथील पंचायत समितीच्या अपहार प्रकरणात शुक्रवारी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील दुसऱ्या आरोपीस अटक केली असून त्यांना शुक्रवारी दुपारी पूर्णा न्यायालयासमोर हजर केले असता सोमवार पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने पारित केले आहेत.

पूर्ण पंचायत समितीमध्ये झालेल्या लाखो रूपायांच्या अपहार प्रकरणी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील वरिष्ठ सहाय्यक मंचक बापूराव भिसे यांना अटक करून शुक्रवारी दुपारच्या सुमारास पुर्णा न्यायालयात हजर केले असता सदरील आरोपीस न्यायालयाने सोमवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत याप्रकरणी अद्याप सात आरोपी फरार असून यामध्ये दोन गट विकास अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

# मानधानी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक स्थळांना भेटीगाठी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन भौगोलिक ठिकाणाला भेटी देऊन पाहणी करून इतिहास जाणून घेतला आहे.

शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणे दाखवणे तेथिल इतिहास प्रत्याक्ष माहीत करून घेणे यावेळी इतिहास अनुभवणे या हेतूने मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी पुढाकार घेऊन शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते या सहलीत रायगड किल्ला,महाडचे चवदार तळे,मुरुड जंजिरा किल्ला,भंडारा डोंगर,जेजुरी गड यांच्यासह दिवेआगर येथील समुद्र किनारा आदी ठिकाणी भेटी



देण्यात आल्या रायगड किल्ला पुस्तकातून किंवा चित्रातून पाहणे वाचणे यापेक्षा स्वतः किल्ला पायी चालत जाऊन प्रतक्ष्य किल्ला व त्यांचा इतिहास कायमस्वरूपी स्मरणात राहत असतो हा इतिहास विद्यार्थी कधीच विसरू शकत नाही म्हणून शैक्षणी सहल सार्थकी ठरते या सहलीसाठी मुख्याध्यापक टी जी साबळे,धनंजय ईक्कर,माधव खुडे,जयानंद मेत्रे, शिवाजी दराडे, शारदा वडकुते,त्रिवेणी पंडित, संजय बोंबले आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले या सहलीमध्ये शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

# शिवसेनेत खान यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेसचे अनेक पदाअधिकारी दाखल

**मानवत,/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून राजकीय पूनर्वसन करण्याचा शब्द मिळाल्याने सईद खॉन यांच्यासह राष्ट्रीय कॉग्रेसचे पदाधिकारी शिवसेनेत दाखल विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून पाथरी मतदारसंघात तिकीट न मिळाल्याने शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश अध्यक्ष सईद खान यांनी पदाचा राजीनामा देऊन रासपकडून विधानसभा निवडणूक लढविली होती.


सईद खॉन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ते निकटवर्तीय समजले जात असल्याने निवडणुकी झाल्यानंतर दोन महिन्यात सईद खान यांना राजकीय पूनर्वसन करण्याचा शब्द मिळाल्यानंतर मुंबईत सईद खान यांनी शिवसेनेत कार्यकर्त्यांसह प्रवेश करत घरवापसी केली आहे.

मानवत : नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर बाजार समिती माजी संचालक दिनेश कोक्कर, माजी नगर सेवक बालाजी कुऱ्हाडे, ॲड. सतिष चव्हाण यांच्यासह माजी नगरसेवक अ. रहीम अ. करीम, गोपाळ गौड, माजी स्वीकृत नगरसेवक बालाजी गोलाईत, शहराध्यक्ष शाम चव्हाण, सीमा सारडा, शैलेश वडमारे, व्यंकटेश चौधरी, किशोर चव्हाण, युनूस मिलनवाले, शैलेश कब्रूवार, जनार्दन कीर्तने, असेफ खान, अफरोज लाला, प्रदीप अग्रवाल यांनी सईद खान यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पाथरी मतदारसंघात दोन वर्षात सईद खान यांनी शिवसेना पक्षसंघटना बांधणीचे काम केले होते. निवडणुकीत त्यांना महायुतीकडून शिवसेनेचे तिकीट मिळेल, अशी अपेक्षा होती. एकनाथ शिंदे यांच्याकडून त्यांना उमेदवारीचा शब्द देण्यात आला होता. मात्र, महायुतीमध्ये जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्याने त्यांनी रासपकडून निवडणूक लढविली. यात त्यांचा पराभव झाला. ५५ हजार मते मिळवत त्यांनी राजकीय लक्ष वेधून घेतले. सईद खान यांची शिवसेनेत घरवापसी होणार, अशी चर्चा होती. मागील १५ दिवसांपूर्वी त्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती.

# राज्यस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा यांची तर सचिव पदी उज्वला भाला यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येथील बालाजी मंदिर महिला मंडळाची नूतन





कार्यकारणीची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मावळत्या अध्यक्षा कांचन बाहेती सचिव पुष्पा तोष्णीवाल, उर्मिला बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सहचिटणीस पदी ज्योती काबरा उपाध्यक्ष शर्मिला मालाणी,कोषाध्यक्ष किरण राठी यांची तर सदस्य म्हणून मीरा गिल्डा, मीना मालाणी, दीपा परताणी कीर्ती मंत्री, प्रिती राठी, अंकिता तोष्णीवाल, स्मिता गिल्डा, गीता करवा, पद्मा मंत्री, अश्विनी बिहाणी, दया दायमा, शितल दोडिया, विद्या व्यास, नेहा लोया ,रामेश्वरी लोया, रूपाली जाजू, पूजा तोष्णीवाल यांची निवड करण्यात आली.

# नगरपालिका निवडणूकीतही विकासासोबत राहा- माजी आ.बोर्डीकर

**सेलू,/प्रतिनिधी-** गत सहा वर्षांत शहरातील डि.पी.रस्त्यांना प्राधान्यक्रम देत त्यासोबत स्ट्रीट लाईट ,नाल्या, फुटपाथ इत्यादी विकासाचे कामे करण्यात आली असल्यामूळेच शहरातील नागरीक भाजपासोबत आहेत तसेच आगामी नगरपालिका निवडणूकीतही भाजपाच्या विकासासोबत जनतेने राहून आपल्या विचाराची पालिका निवडून आणण्याची विनंती माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी बूधवार ८ रोजी शंकरलींगमंदीर देवस्थान सभागृह बांधकाम व फूले नगर येथे सिमेंट रस्ता भूमिपूजन प्रसंगी केली.



यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,परभणी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.ऋतुराज साडेगावकर, तालुका अध्यक्ष ॲड दत्ता कदम, शहाराध्यक्ष अशोक अंभोरे, शिवाजी खेडकर, भाऊसाहेब सोनवणे ,गणेश काटकर मुख्याधिकारी युवराज पौळ, न.प. अभियंता नागेश पैठणकर,धुळगंडे, बालासाहेब सरकाळे, दिनकर वाघ आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना बोर्डीकर म्हणाले की,विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून आमदार मेघना बोर्डीकर यांनी गत पाचवर्षात कामे केली असल्याने समाजातील व्यक्तींनी भरभरून मतदान केले म्हणून आज आमदार मेघना बोर्डीकर राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. आम्ही देखील तेवढ्याच ताकदीने उभं राहून शहारातील गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. समाजातील गरजा ओळखून त्यांना प्राधान्यक्रम दिला पाहिजे या मताचा मी आहे. कोणत्याही समाजाचं कामं करताना दुजा भाव न ठेवता सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत करणारं आहेत.

शहरातील रस्ते, नाल्या, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, स्वच्छता यावर लक्ष केंद्रित करून शहरात विकास केला जाणार आहे. यासाठी आपण सर्वांनी हिंदुत्व हा विचार मनात ठेवून आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. देशात नरेंद्र मोदीतर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस असल्यामूळे शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आमच्या विचारांची नगर परिषद आमच्या ताब्यात द्या.व मग विकास कामे कशी होतात ती बघा असे अवाहन यावेळी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,सुत्रसंचलन सचिव प्रा . मिलिंद झमकडे, आभार निलेश मिटकरी यांनी मानले.याकार्यक्रमासाठी गणेश गोरे, अर्जुन बोरुळ, बाळू काजळे, सुनील चव्हाण, प्रकाश शेरे, ,कपिल फुलारी, दत्ताआप्पा मिटकर , बबन आप्पा झमकडे, राजेंद्रआप्पा नावाडे, राजेंद्रआप्पा महाजन, अरुणआप्पा सोळंके, वाल्मीक खुळे गणेश डेंगळे मोहन माने पप्पू शिंदे विठ्ठल कोकर, अशोक कोपुलवार, सुनील काळे, सुनील चव्हाण, गणेश ढेंगळे, आण्णा केवारे, शिवकुमारआप्पा नावाडे, कानडे आप्पा, निजलिंग तरवडगे आदींनी पूढाकार घेतला.

# खंडणी,खून परस्पर संबंध
# वाल्मीक कराडला ७ दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

सरपंच संतोष देशमुख हत्या व अवादा कंपनीला मागितलेली खंडणी दोन्ही घटनांचा परस्पर संबंध आहे. खंडणीला अडथळा ठरत असल्याने संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची महत्त्वाची माहिती एसआयटीने बुधवारी वाल्मीक कराडला न्यायालयात हजर याप्रकरणाच्या आणखी तपासासाठी वाल्मिक कराडची चौकशी करायची असल्याचं सांगत आरोपीची पोलीस कोठडी



मागण्यात आली होती. त्यानुसार, वाल्मिक कराडला न्यायालयाने ७ दिवसांची एस आय टी कोठडी दिली आहे.

संतोष देशमुख हत्याप्रकरणी एसआयटीने बीड न्यायालयात दिलेल्या माहितीत अनेक मोठे खुलासे करण्यात आले आहेत. आरोपींकडून वारंवार अवादा कंपनीकडे खंडणीची मागणी होत होती,पण कंपनीने ती पूर्ण केली नाही.त्यावेळी, संतोष देशमुख हेच खंडणीसाठी अडथळा ठरत असल्याने त्यांची हत्या करण्यात आल्याचं एसआयटीने न्यायालयात म्हटलं आहे. एसआयटीने आज न्यायालयात ७ दावे केले आहेत. सुदर्शन घुले, वाल्मिक कराड आणि चाटे यांनी अवादाच्या अधिकाऱ्यांना धमकावूनही खंडणी दिली नव्हती. अवादा कंपनीची बाजू घेत देशमुखांनी सुदर्शन घुलेला आव्हान दिलं होतं. खंडणीला अडथळा ठरले म्हणून वाल्मिक कराड आणि इतर आरोपीनी संतोष देशमुखांची हत्या केल्याचा दावा एसआयटीने केला आहे.





उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीडच्या वतीने राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ निमित्त रॅलीला हिरवा झेंडा दाखवितांना उपप्रादेशिक अधिकारी स्वप्नील माने, मोटार वाहन निरीक्षक राहुल माने, रंजीत पाटील मोटार वाहन निरीक्षक, मोटार वाहन निरीक्षक पंकज यादव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया–श्रीकांत कुलकर्णी)

# रामेश्वर मोरे बारामती येथे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ जानेवारी**

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यभरामध्ये अनेक महाविद्यालयांमध्ये करियर संसदेची स्थापना करण्यात आलेली आहे.युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा काम करत आहे.या उपक्रमांतर्गत सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव या महाविद्यालयीन करिअर संसदेचे पदाधिकारी म्हणून रामेश्वर मोरे यांनी महत्त्वपूर्ण काम केलेले आहे. गेल्या वर्षभरामध्ये दिलेले प्रत्येक कार्य अगदी वेळेत आणि सातत्यपूर्ण पद्धतीने पूर्ण केल्याबद्दल करियर संसदेचा उत्कृष्ट पदाधिकारी म्हणून त्यांना बारामती येथे करियर संसदेचा राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ.पराग काळकर, एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन मा.राजेंद्र पवार,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष मा.यशवंत शितोळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं.

करिअर संसदेचे राज्यस्तरीय अधिवेशन बारामती येथे आयोजित करण्यात आल होत, यामध्ये देशातील अनेक प्रशासकीयअधिकारी, उद्योजक, लेखक, नामवंतवक्ते,मार्गदर्शनासाठी उपलब्ध होते.अधिवेशना दरम्यान हा पुरस्कार राज्यस्तरीय समितीने निवडलेल्या संपुर्ण महाराष्ट्रातून फक्त पाच विद्यार्थांना देण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध भागातील करिअर कट्टाचे पदाधिकारी उपस्थित होते.या यशाबद्दल सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जि.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे,करिअर कट्टा समन्वयक डॉ.बिलास काळे यांच्यासह सर्व प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# शैक्षणिक क्षेत्रात डॉ. बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय–डॉ.जिजाराम बागल

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ जानेवारी**

शैक्षणिक क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जिजाराम बागल यांनी केले. महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना हे तर कार्यालयीन अधीक्षक विजय कुलकर्णी, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख डॉ. प्रेम राठोड उपस्थित होते.



नाम विस्तार दिनानिमित्त बोलताना डॉ. बागल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगितली. १९५० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद कॉलेजची स्थापना केली व पुढे २३ ऑगस्ट १९५८ ला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. परंतु विद्यापीठाला काय नाव असले पाहिजे यासाठी शासनाने एक समिती स्थापन केली. शासनाने विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचे ठरवले. २७ जुलै १९७८ ला दोन्ही सभागृहांनी यास मान्यता दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ. गजानन होन्ना म्हणाले की, मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराच्या बाजूने त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होता. विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी यासाठी कार्य केले आहे. बाबासाहेबांचे विचाराचा आपण आदर्श घेतला पाहिजे व त्यानुसार वर्तन केले पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कमलकिशोर लड्ढा यांनी केले तर आभार डॉ. प्रेम राठोड यांनी मानले.

# शिक्षण विस्तार अधिकारी काळात पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ जानेवारी**

मन व मनगट मजबूत करण्यासाठी शालेय जीवनापासुन खेळ आणि व्यायामाची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने निपुण जल्लोष २०२५ या कार्यक्रमांतर्गत पालकांसह विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्या निमित्ताने बुधवार दि.१५ रोजी शिक्षण विस्तार अधिकारी काळम पाटील यांच्या उपस्थितीत गुळज, धोंडराई व वसाहत बागपिंपळगाव या बीट मधिल शाळांची गेवराई पंचायत समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती.



तर्कसंगत विचार व कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी कृती करण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. या अनुषंगाने आनंददायी शनिवार हा उपक्रम राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीसाठी संदर्भ क्रमांक दोन नुसार राबविला जात आहे.राज्यात सन २०२६ – २७ पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता तिसरीच्या पुढे गेलेल्या तथापि अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्ये, मौखिक भाषा विकास, उच्चार शास्त्राची जाणीव, सांकेतिक भाषा समजून घेणे, शब्दसंग्रह वाचन व अकलन, वाचनातील ओघवतेपणा, लेखन, आकलन, वाचन संस्कृती व वाचनाकडे कल तसेच पायाभूत संख्या साक्षरता, संख्याज्ञान व गणितीय कौशल्ये यासंबंधीच्या क्षमता अवगत होणे अपेक्षित आहे. यासाठी विविध शैक्षणिक साहित्य मनोरंजक खेळ आनंददायी उपक्रम सृजनशील प्रयोग यांची अंमलबजावणी शिक्षक करत आहेत.यास अनुसरून शालेय जिवनात शिक्षण घेता घेता विद्यार्थी मधील खेळाडू वृत्ती मरु नये यासाठी निपूण जल्लोष या कार्यक्रमांतर्गत शिक्षण विभाग पंचायत समिती गेवराई येथील जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी काळम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील खेळ व विविध स्पर्धा या २१ जानेवारी पासून सुरू होत असून या स्पर्धेच्या अनुषंगाने बुधवार दि.१५ रोजी पंचायत समिती गेवराई या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत निपुण जल्लोष या कार्यक्रमांतर्गत समितीची स्थापना करण्यात आली यामध्ये आरोग्य समिती, पाणी पुरवठा समिती, पारितोषिक समिती, प्रसिद्धी समिती, नियोजन समिती, स्पर्धात्मक भुमिका, वैयक्तिक स्पर्धा, मैदान समिती, व्यासपीठ समिती, सांस्कृतिक समिती अशा विविध समित्यांचे गठण करुन त्यांना कामे सोपविण्यात आली आहे. यावेळी सर्व उपस्थित शिक्षकांना बोलताना काळम पाटील म्हणाले की, २०२७ मध्ये जेव्हा या निपुण जल्लोष कार्यक्रमाची सांगता होईल तेव्हा आपल्या बीटचे नाव व्हावे. यासाठी सर्वांनी आनंदाने या स्पर्धेत्मक कार्यक्रमात सहभागी व्हावे असे ही यावेळी सांगितले. यावेळी केंद्रप्रमुख भगवान मोरे, केंद्रप्रमुख नामदेव शिंदे, केंद्रप्रमुख विशाल कुलकर्णी आदींसह बीट मधील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयवान कुटे यांनी केले.

# ऋतु बदलाचे महत्त्व जाणण्यासाठी भूगोलाचा अभ्यास महत्त्वाचा–हरिभाऊ साबळे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आयोजित भूगोल दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक तथा भूगोल विषय तज्ञ श्री हरिभाऊ साबळे यांनी शालेय जीवनात भूगोल विषय हा खुप गरजेचा आहे ते सांगितले. मकर संक्रांतीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. यावेळी निसर्गात अनेक बदल होत असतात. अशा ऋतु बदलाचे महत्त्व जाणण्यासाठी भूगोलाचा अभ्यास शालेय जीवनात महत्त्वाचा आहे. असे प्रतिपादन साबळे यांनी केले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक विठ्ठल काळे यांनी भूगोल दिनाचे महत्त्व सांगून त्याविषयी जगातील भौगोलिक प्रदेशांची थोडक्यात माहिती विद्यार्थ्यांना दिली.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भूगोल संदर्भित काही मॉडेल्स तयार करुन आणले.यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर, विषय प्रमुख श्री हरिभाऊ साबळे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विनायक कुलकर्णी यांनी केले.

# शासकीय रेखाकला परीक्षा (इंटरमेजिएट,चित्रकला) २०२४ च्या परीक्षेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील चैत्राली करपुडेचे राज्यस्तरावर यश

**खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १००% निकालाची परंपरा कायम**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ जानेवारी**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेण्यात येणा–या शासकीय ग्रेड परीक्षा (चित्रकला) २०२४ चा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून यात चैत्राली करपुडे इ.९वी या विद्यार्थिनीने महाराष्ट्रात पन्नासावा क्रमांक पटकावला आहे.जिल्हा परिषद केंद्र १३१००२ या केंद्रावर ७६ विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ट झाले होते.त्यापैकी – ग्रेड मध्ये २६,आदित्य कावळे,अमृता हेडे,अनिकेत गित्ते,अंजली पांचाळ,अनुष्का बिंरगे,अरूधंती देशपांडे, धनश्री बडे,गार्गी चाटे,गौरव जैन,जयश्री केंद्रे,कौस्तुभ मातेकर,क्षितीजा धायगुडे, लावण्या देशपांडे,माहेश्वरी भताने,परिक्षीत पाखरे,प्रिया माळी,प्रियल जोशी,साक्षी जाधव,संस्कृती कापसे,श्रेया दिंडोरे,श्रीकृष्ण माने,सुमेधा शेप,स्वराली महाजन,तनस्वी चौरे,वेदिका कदम इ ग्रेड मध्ये २३ तर उ ग्रेड मध्ये २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयाचा शेकडा निकाल १००% लागला आहे.वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक उमेश डोंगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.वरील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्षडॉ.अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,शालेय समितीचे सर्व सदस्य,उपमुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रातील टॉप १०० विद्यार्थ्यांच्या यादीत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु .चैत्राली शिवदास करपुडे ९वी ई या विद्यार्थिनी चा ५० वा क्रमांक तीच्या या नेत्र दीपक यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

# सीईडी इंडिया फाउंडेशनचा ५ स्टार रँकिंग A++ पुरस्काराने न्यू व्हिजन पब्लिक स्कुल सन्मानीत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ जानेवारी**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल या शैक्षणिक संस्थेस CED इंडिया फाउंडेशन यांच्या द्वारे देण्यात येणारा शैक्षणिक संस्था साठी अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा २०२४–२५ चा ५ स्टार रँकिंग A++ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकताच दि १२ जाने रोजी रेडिसन ब्लू हॉटेल ,नवी दिल्ली येथे हा पुरस्कार पदमश्री प्रो डॉ दिनेश सिंग (चान्सलर, के आर मंगलम युनिव्हर्सिटी, हरियाणा) व डॉ श्रीधर श्रीवास्तव (सहसंचालक एन सी ई आर टी) यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरित करण्यात आला. हा पुरस्कार न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांनी स्वीकारला.



श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाईच्या वतीने सदैव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील असते . त्यासाठी आवश्यक सर्व त्या भौतिक तथा शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये समाज जागृती व प्रगती व्हावी या हेतूने सतत संस्था प्रयत्नशील असते . संस्थेचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोचावे यासाठी संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्यासोबतच संस्थेचे प्राचार्य तथा सर्व शिक्षक हे मेहनत घेत असतात. याचेच फलित म्हणून आज न्यू व्हिजन पब्लिक स्कूलला (CED India foundation) सी ई डी इंडिया फाउंडेशन यांच्याद्वारा देण्यात येणारा अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा असा स्टार रँकिंग वार्ड २०२४–२५ साठी ५ स्टार रँकिंग A++ हा पुरस्कार प्राप्त झाला. रेडिसन ब्लू हॉटेल नवी दिल्ली येथे सन्मानपूर्वक देण्यात आला . संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण करून आजपर्यंत शेकडो विद्यार्थी देशभरात मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. ज्यामध्ये डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक याचबरोबर मोठ्या उद्योग धंद्यात आपले , आपल्या संस्थेच्या सोबतच देशाचे नाव उज्वल करत आहेत. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने निवासी मतिमंद, मूकबधिर तथा दिव्यांग विद्यालय तसेच मातोश्री वसतिगृह त्याचबरोबर घाट नागनाथ प्राथमिक विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , फार्मसी महाविद्यालय, बी सी ए महाविद्यालय या व अशा विविध शैक्षणिक संस्था अंबाजोगाई शहरात हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत.

या पुरस्कारासाठी संपूर्ण देशभरातून १४५६ शाळांनी आपला सहभाग नोंदवला होता. यापैकी १०३ शाळांना ग्रीन स्कूल या कॅटेगरी मध्ये हा पुरस्कार मिळाला . या पुरस्कारा साठी शाळेची निवड करतांना शाळेचा मागील तीन वर्षाचा एकूण निकाल , शाळेची इमारत, शाळेतील शैक्षणिक सुविधा व त्यांचा वापर , निसर्गरम्य परिसर , शाळेचे क्रिडांगण इत्यादी मानदंडाचा विचार करून संस्थांची निवड करण्यात आली . या पुरस्कार प्राप्तीसाठी संस्थेचे संस्थापक राजकीशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक डॉ .डि.एच. थोरात ,प्रा. वसंत चव्हाण , डॉ . बी . आय . खडकभावी , प्रा सुरेश बिराजदार , यांनी संस्थेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन , संस्थेचे सर्व शिक्षक , विद्यार्थी, पालक यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे आदर्श गाव वंजारवाडी येथे शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक व युवती निवासी शिबिर आदर्श गाव वंजारवाडी तालुका जिल्हा बीड येथे दिनांक १७ जानेवारी २०२५ ते २३ जानेवारी २०२५ या दरम्यान संपन्न होत आहे या सात दिवशीय विशेष शिबिरासाठी अनेक उपक्रम आयोजित केले असून या उपक्रमामध्ये महिला आरोग्य तपासणी व किशोरवयीन मुला मुलींची आणि निमिया चाचणी घेण्यात येणार आहे तसेच विविध विषयावर व्याख्याने,योगा ट्रेनिंग, बालविवाह प्रतिबंध रॅली अशा अनेक उपक्रमाचे आयोजन केले आहे. या शिबिरासाठी महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक व स्वयंसेवक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आव्हान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉक्टर उत्तम साळवे, कार्यक्रमाधिकारी प्रा संजय काळे, प्राध्यापक डॉ.सुहास जोशी, प्रा. दीपा देशपांडे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक प्रतिनिधी चि. अजय शिंदे व कु. वैभवी गरुड यांनी केले आहे.

# उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तकांचा सत्कार

## ग्रामीण भागातील लोकांपर्यंत आरोग्याच्या सुविधा पोहचविण्याचे काम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

ग्रामीण भागात आरोग्याच्या विविध सेवासुविधा पोहोचविण्याचे काम आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांकडून होत आहे. घरोघरी जाऊन महिलांशी संवाद साधून जनजागृती करण्याचे कामही या महिला करीत आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी येथील जिल्हा परिषदेच्या षटकोनी सभागृहात बुधवार दि १५ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेच्यावतीने जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, समाज कल्याण अधिकारी राजू एडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, आरोग्य अधिकारी सतीश रूणवाल, अनिता चव्हाण, श्रीमती वडकुते, शंकरराव तावडे, आशा प्रशिक्षक मारोती एंगडे, अजहर अली सय्यद, डॉ सुनील देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले म्हणाल्या की, ग्रामीण भागात आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक आरोग्याच्या सेवासुविधा पोहचवत आहेत. याचा फायदा ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणावर मिळत असून विविध प्रकारचे सर्वेक्षण, विविध प्रकारचे लसीकरण यासाठी या महिला नेहमीच अग्रेसर आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेणे आवश्यक असून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा सत्कार सोहळा आयोजित केला आहे. त्यांचे कार्य असेच अविरत चालू ठेवतील अशी अपेक्षा यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके यांनी आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी जिल्हास्तरीय उत्कृष्ट काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकामध्ये भाग्यरथा शिवाजी शिखरे, भांडेगाव, अनिता अशोक जळके, भांडेगाव, वंदना गजानन लेकुळे, पिंपळदरी तसेच जिल्हास्तरीय गटप्रवर्तकांमध्ये दिपिका दिपक देशपांडे नर्सी नामदेव, रेणुका दिवाकर देशपांडे आखाडा बाळापूर, दिपाली ओंकार पडोळे टेंभूर्णी, संगीता विठ्ठल जगताप कवठा, ज्योती बाजीराव कहाते जवळा बाजार यांचा मान्यवरांच्याहस्ते स्मृतीचिन्ह, रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला तसेच तालुकास्तरीय आशा स्वयंसेविकामध्ये सोनाली दत्तराव खंदारे, मणकर्णा कानबाराव खुडे, वैशाली गणेश ढगे, निता भारत गायकवाड, मीराबाई परसराम पोटे, प्रेमिला गजानन रणखांब, प्रणाली प्रल्हाद खिल्लारे, श्रीवंता उत्तमराव बर्गे, नीता प्रदीप जयस्वाल, मुक्ता शेकुराव खुडे, मनिषा रमेश पंडीत, संघप्रिया निशीकांत नरवाडे, सुचिता शामराव पांडे, सीमा रेणुकादास पांडे, नयना संतोष बेंगाळ यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# महारेशीम अभियानाला जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवी झेंडी

## तुती लागवडीसाठी ४ लाख १८ हजार अनुदान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

जिल्ह्यात रेशीम शेती फायद्यात असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना महत्व पटवून देण्यासोबतच त्यांना या शेतीकडे आकर्षित करण्यासाठी जिल्ह्यात ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते रेशीम रथास हिरवी झेंडी दाखवून आज करण्यात आली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) अनिल माचेवाड व जिल्हा रेशीम विकास अधिकारी पि. एस. देशपांडे हे उपस्थित होते. रेशीम उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. जिल्ह्यातील हवामान या उद्योगास पोषक असल्यामुळे रेशीम उत्पादन करण्यास भरपूर वाव तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिकस्तर व जीवनमान उंचावण्यास मदत करणारा हा उद्योग आहे. शेतकऱ्यांना या उद्योगाची परिपूर्ण माहिती नसल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने या उद्योगाकडे वळलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर व्यापक प्रमाणात जनजागृती आणि तुती लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी करणे या दुहेरी उद्देशाने महारेशीम अभियान दि. ०९ जानेवारी ते दि. ०९ फेब्रुवारी या कालावधीत जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात राबविले जात आहे. त्यामुळे या अभियानादरम्यान जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी केले आहे.

अभियानात प्रशासकीय यंत्रणेसोबतच कृषि विभाग यांची मदत घेतली जात आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत केवळ मजुरीसाठी २ लाख ६५ हजार रुपये आणि कुशलचे १ लाख ५१ हजार रुपये अनुदान आहे. यामध्ये तुती लागवड, जोपासना, संवर्धन व किटक संगोपन करणे यासाठी ६८२ मनुष्य दिवस, तसेच किटक संगोपनगृह बांधकामासाठी २१३ मनुष्य दिवस असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

# नांदेड परिक्षेत्रात कुरूंदा, बासंबा पोलिस ठाण्याची महत्वपूर्ण कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

नांदेड परिक्षेत्रातील सर्व पोलिस ठाण्यांचे पोलिस कामकाजाशी संबंधित विषयावर दर महिन्यास परिक्षण करून त्यांना प्रोत्साहनपर पारितोषिक योजना हाती घेण्यात आली असून यामध्ये परिक्षेत्रातील ९१ पोलिस ठाण्यांमधून हिंगोली जिल्ह्यातील कुरूंदा आणि बासंबा पोलिस ठाण्याने अनुक्रमे पहिला व तिसरा क्रमांक मिळवला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, लातुर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील पोलिस ठाणे येतात. या पोलिस ठाण्यांमधून गुन्हे निकाली काढणे, गुन्हे उघडकीस आणणयाचे व ऐवज जप्त करणे, अर्ज चौकशी, चारित्र्य पडताळणी, पासपोर्ट, समन्स व वॉरंट बजावणी, फरारी व पाहीजे असलेले आरोपी अटक करणे, प्रतिबंधक कार्यवाही, दोषसिध्दी, सीसीटीएनएस, अभिलेख अद्ययावतीकरण, अवैध व्यवसाय विरोधी कारवाई या निकषावरून प्रत्येक पोलिस ठाण्यांनी केलेल्या कामगिरीचे मोजमाप केले जात आह.

यामध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन पोलिस ठाण्यांना प्रत्येक महिन्यास बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात येते. परिक्षेत्रातील एकूण ९१ पोलिस ठाण्यांचे परिक्षण केले असता त्यात हिंगोली जिल्ह्यातील कुरूंदा पोलिस ठाण्याने सर्वच विभागात सरस कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील सोनखेड पोलिस ठाण्याने द्वितीय तर हिंगोली जिल्ह्यातील बासंबा पोलिस ठाण्याने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, बासंबा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विकास आडे यांचा पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमा प यांनी बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला आहे. जास्तीत जास्त लोकाभिमुख कामकाज करून नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यावर भर द्यावा असे आवाहन शहाजी उमाप यांनी केले आहे.



**हिंगोली– स्वामी विवेकानंद जन सेवा फाऊंडेशन आणि गॅलक्सीच्यावतीने गाडीपुरा भागात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ९५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी ॲड ईश्वर प्रजापती, ऋषी चौधरी, गोविंद ठाकूर, संकेत सोमाणी आदींनी परिश्रम घेतले.**

# श्री संत भगवानबाबा यांची पुण्यतिथी साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

येथील एन टी सी भागातील श्री संत भगवान बाबा उद्यानात श्री संत भगवान बाबा यांची पुण्यतिथी श्री संत भगवानबाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या पुढाकारातून साजरी करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी मेजर पंढरीनाथ घुगे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले यामध्ये शिवशंकर घुगे,एकनाथ कुटे,प्रा. मुरलीधर जायभाये,संजय चाटे, राजकुमार मोरगे, पिंटू नागरे, राज बांगर, नितीन घुगे, बलवंत कुटे, सुभाष बांगर, ज्ञानेश्वर दराडे, बालाजी बांगर, गजानन बांगर, बबन कुटे,रामदास मुंढे, निवास कुटे, डॉ राहुल घुगे, डॉ भानुदास सांगळे, संतोष दराडे, दिनकर घुगे, गजानन मुंढे, वैभव घुगे, गोपाल दराडे, तुळशीराम घुगे, संदीप घुगे आदींनी अभिवादन केले. कार्यक्रमासाठी एन टी सी भागातील भक्तगण व हिंगोली शहरातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार मोरगे यांनी सूत्र संचलन पिंटू नागरे तर आभार प्रदर्शन गोपाल बांगर यांनी केले. श्री संत भगवान बाबा यांच्या कार्याचा परिचय करून देतांना प्रा. मुरलीधर जायभाये म्हणाले की, संत भगवानबाबा अत्यंत शिस्तबद्ध होते. भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा समन्वय साधला होता. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. विठूनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला.

## संक्षिप्त वृत्त

### सेवा ज्येष्ठ मदतनीसांना अंगणवाडी सेविका पदावर थेट नियुक्ती

हिंगोली– महिला व बालकल्याण विभागांकडील दि. २७ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार अंगणवाडी मदतनीस पदांमधून विहित शैक्षणिक पात्रता पूर्ण करणाऱ्या सेवा ज्येष्ठ मदतनीसांना अंगणवाडी सेविका पदावर थेट नियुक्ती देण्याच्या सूचना प्राप्त आहेत. हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पात्र अंगणवाडी मदतनीस यांना रिक्त असलेल्या अंगणवाडी सेविका या पदावर थेट नियुक्ती देण्याची प्रक्रिया बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) यांच्यामार्फत सुरु करण्यात येत आहे. बंधित गावातील अंगणवाडी मदतनीसांनी बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच कार्यालय किंवा त्रयस्थ व्यक्तीकडून कोणतेही प्रलोभन दाखविण्याचा प्रकार झाल्यास मदतनीसांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली व जिल्हा परिषद कार्यालय, हिंगोली येथे तक्रार करावी, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केले आहे.

### ईस्त्रायलमध्ये रोजगारांच्या संधी

हिंगोली– महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या २५ ते ४५ वर्षे वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवाराकडे (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण, पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवायफरीमधील प्रशिक्षण संबंधित भारतीय अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजीओ थेरपी, नर्स असीस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच जीडीए, एएनएम, जीएनएम, बी.एस्सी नर्सींग, पोस्ट बी.एस्ससी नर्सींगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. इस्त्राईलला नोकरीसाठी जाणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छूक उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन आपल्या नावाची नोंदणी करुन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. रा. म. कोल्हे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली यांनी केले आहे.

### तक्षशीला बुध्द विहारात नामविस्तार दिन

हिंगोली– शहरातील सिध्दार्थ कॉलनी भागातील तक्षशीला बुध्द विहारात नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी त्रिशरण पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमास लक्ष्मीबाई इंगोले, प्रयागबाई हनवते, रूक्मीणबाई पुंडगे, आशाबाई खिल्लारे, पंचफुलाबाई कांबळे, इंदिराबाई वाधमारे आदींची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांना नियमित सेवेत घेण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रूजु झालेल्या कार्यालयात केलेल्या कामाच्या अनुभवावरून पुढील कार्यकाळासाठी नियमित करून शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे.

राज्य शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेतून सुशिक्षीत बेरोजगारांना सरकारी कार्यालयात काम करण्याची संधी मिळाली. यामध्ये अनेकजण पदवीधारक व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहेत, ते उत्तमप्रकारे सरकारी कार्यालयात कामकाज करीत आहेत. संगणक कामकाजासह इतर कामे ते करीत आहेत. जिल्हा परिषद आस्थापनेत अनेक प्रशिक्षणार्थी काम करीत आहेत. त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार मुळ आस्थापनेत पुढील कार्यकाळात नियमित करून शासन सेवेत सामावून घेण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर दत्ता इसाये, सुरजकुमार वैष्णव, अक्षय नरवाडे, सोनाली राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आदर्शमध्ये भारतीय सैन्य दिवस साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

येथील आदर्श महाविद्यालय एनसीसी विभागाच्या वतीने भारतीय सैन्य दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .विलास आघाव , एनसीसी विभाग प्रमुख मेजर पंढरीनाथ घुगे, डॉ. सोपानदेव खरात व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगासागर मस्के यांनी तर प्रास्ताविक मेजर पंढरीनाथ घुगे यांनी व आभार प्रदर्शन शिवानी सावळे यांनी केले. भारतीय सैन्याचा युद्ध इतिहास जानवी शितोळे व वैष्णवी दवणे यांनी याप्रसंगी विशद केला. प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त करताना मेजर पंढरीनाथ घुगे यांनी आज भारतात सैन्य दिन साजरा केला जात आहे. हा दिवस देशाच्या एकता आणि बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांच्या सन्मानार्थ लष्कर दिन साजरा केला जातो. या दिनानिमित्त आपण परेड आणि विविध कार्यक्रमांचे रस्ता सुरक्षा अभियानातील प्रमाणपत्र वाटप व वक्तृत्व उपक्रमाचे आयोजन केले आहे.

अध्यक्ष समारोपात प्राचार्याने अदम्य साहस जवानांचे शौर्य यांचा सन्मान म्हणून आजचा दिवस सर्वत्र सैन्य दिवस म्हणून साजरा केला जातो, सैन्यांच्या पराक्रमामुळे व त्यागामुळे भारत देश सुरक्षित असून अनेक युद्धजन्य परिस्थितीत भारताने आपले पराक्रम व शौर्यगाथा सिद्ध केलेली आहे, असे मार्गदर्शनपर विवेचन केले. याच कार्यक्रमाच्या दिवशी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सुरक्षा सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी घेतला त्यांना प्रमाणपत्र प्राचार्यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे सीनियर अंडर ऑफिसर कृष्णा साबळे, शिवानी सावळे आदिनाथ गाडगीळ, विठ्ठल कदम, सुनील पठाडे, शिवराज देवकर आदी विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.

# पाणी गुणवत्ता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जानेवारी**

पाणी गुणवत्ता सहनियंत्रण सर्वेक्षण कार्यक्रम जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय कुलकर्णी यांनी केले यांनी केले. ग्रामीण भागातील जनतेला गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाणी गुणवत्ता सहनियंत्रण सर्वेक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व्हावी हा प्रशिक्षणाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नामदेव केंद्रे यांनी मार्गदर्शनात ग्रामीण भागामध्ये निर्मिती शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे व साथीच्या रोगांना बसावा. याकरता गुणवत्तेचे सर्व नियंत्रण करून सर्वेक्षण आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. जिल्हास्तरीय प्रशिक्षणास सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत केशवराव गडापोड, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता अतुल सोळंके, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, समाज कल्याण अधिकारी राजू एडके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, जिल्हा साथरोग अधिकारी प्रकाश जाधव, वरिष्ठ भूवैज्ञानिक सचिन खोडे, रवींद्र मांजरकर,गटविकास अधिकारी पाते उपस्थित होते. यावेळी भारत खुडे, बेले, राहुल भालेराव यांनी माहीती दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भारतीय हवाई दलातील विमानांची अनुभूती

तभा वृत्तसेवा
बिलोली,दि. १५ जानेवारी

मिग-२१, जॅग्वार, मिराज-२०००, मिग-२९, सुखोई-३०, तेजस व रायफल यासह उडता मासा व उरी या चित्रपटात शत्रूच्या जागेची रेकी करण्यासाठी वापरण्यात आलेल्या गरुड पक्षाची प्रतिकृती उडवीत एरोमॉडलिंग शो च्या माध्यमातून हवाई दलातील फायटर्सची माहिती व विमान विद्येची अनुभूती बुधवार (दि.१५) रोजी सगरोळी ता. बिलोली येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी घेतली.



राष्ट्रीय थलसेना दिनी येथील सैनिकी विद्यालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी एरोमॉडलिंग शो हे विद्यार्थी, पालक व नागरिकांचे आकर्षण ठरले. भारतीय हवाई दलातील एकापेक्षा एक असलेल्या विमानांच्या प्रतिकृती रेडीओ कंट्रोलद्वारे उडवून चित्तथरारक कवायतींचे प्रात्याक्षिके दाखविली. प्रख्यात विमान छंदिष्ट सदानंद काळे व विक्रमवीर रेडीओ कंट्रोल एरोमॉडेलर अथर्व काळे यांनी भारतीय हवाई दलातील विविध प्रकारचे विमान तयार करून हजारो शोच्या माध्यमातून माहिती व विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आहे. हा एरोमॉडलिंग शो सैनिकी विद्यालयाने इतर विद्यार्थ्यांना देखील अनुभवायास मिळावा यासाठी परिसरातील प्रशालेतील विद्यार्थ्यांना निमंत्रित केले होते. सैनिकी विद्यालयातील उपक्रमांची स्तुती देखील केली. विपीन कुमार यांना मानवंदना देण्यात आली. सैनिकी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांसमोर अश्वारूढ चित्तथरारक प्रात्याक्षिके सादर करून वाहवा मिळविली. एरोमॉडलिंग शो मधून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. एरोमॉडलिंग शो, पथसंचलन व हॉर्स रायडींग या उपक्रमामुळे खऱ्या अर्थाने 'भारतीय थलसेना दिवसा'ची अनुभूती प्राप्त झाली.

▶▶पालक, कविता प्रकाश लांडगे नांदेड
एरोमॉडलिंग शो व इतर उपक्रमांमधून विद्यार्थी प्रेरणा घेऊन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील सशक्त भारत बनविण्याच्या वाटचालीत आजचा दिवस अतिशय महात्वाचा ठरेल. संघटन, शिस्त, समर्पण व देशप्रेम हे थलसेना दिनानिमित्त आयोजित उपक्रमातून स्पष्ट दिसून आले.

▶▶पालक, हेमंत नंदकिशोर देशमुख, नांदेड.
राष्ट्रीय थलसेना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी परिसरातील विद्यार्थ्यांना निमंत्रित केल्याने विद्यार्थ्यामध्ये भारतीय सैनिकांप्रती प्रेम व आदर निर्माण होईल.

▶▶अशोक दगडे, मुख्याध्यापक, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, बिलोली विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी वर्दीधारी अधिकारी व आजी, माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. गिरीश आलूरकर, प्राचार्य, सैनिकी विद्यालय, सगरोळी

▶▶राष्ट्रीय थलसेनादिनी सगरोळीत भारतमातेच्या जयघोषाने आसमंती निनादला

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्साहात

**मुदखेड-**मुदखेड तालुक्यातील बारड येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड अंतर्गत श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय व स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक विद्यालय आणि शंकरराव देशमुख सीनियर कॉलेज बारड तसेच श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठान बारड संचलित शंकरराव देशमुख सीनियर कॉलेज बारड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध वक्ते वसंत हंकारे हे होते बाप समजून घेताना या विषयावर त्यांनी आपले परखड विचार मांडताना बाप आणि बापाचे महत्त्व विशद केले आधुनिक काळामध्ये बिघडणाऱ्या वातावरणामध्ये मुलींनी कोणती दक्षता घ्यावी आणि समाजामध्ये आपल्या आई वडिलांची मान कशी उंच व्हावी याबद्दल प्रतिनिर्घ मार्गदर्शन केला आणि अक्षरशा मुली आई आणि पालकांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजयराव देशमुख बारडकर उपाध्यक्ष रमेशचंद्र आदिनाथ महाजन सचिव रामेश्वर कोरबनवाड सहसचिव अशोक सखाराम गव्हाणे, श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ छायाताई संजयराव देशमुख व सर्व संचालक मंडळ , परिवारातील हितचिंतक विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक रामकिशन चूब्बेवार, प्राचार्य हेमंत इंगळे, व प्राचार्य सचिन गव्हाणे पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केलेलं होतं कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ पंजाब शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक प्रमुख मनोहर ओसावार यांनी मानले.

### आदमपूर परिसरात मकर संक्रांत सणानिमित्त शेत शिवारे फुलली

**आदमपूर-**बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर, गळेगांव, थडीसावळी, टाकळी, अटकळी, खतगांव, केसराळीआदी परिसरात इंग्रजी नव्या वर्षातील दि.१४ जानेवारी रोजी मकरंसंक्रांत हा सण साजरा करण्यात आला. भल्या पहाटे ठिक ठिकाणी वाटेवरती नागरिक, बच्चे कंपनी, मित्र



परिवारासह शेत शिवारे थंडीतही फुलल्याचे चित्र मनाला समाधानकारक असेच होते. उत्साह आणि समृद्धीचे प्रतीक असलेला मकर संक्रांत हा सण सर्व नैराश्य आणि वाईट प्रवृत्ती दूर करून आपल्या सर्वांच्या आयुष्यात नवचैतन्य घेऊन येत असतो.शेतात कडब्याच्या,उसाच्या पेड्यांची खोपी आणि खोपीवर नवे वस्त्र पांघरूण उभारणी केली जाते. आत खोपीत पाच पांडव,रानातील उस, बोरे, गाजर, जांब,हळदी,कुंकू, सुवासिक अगरबत्ती,रांगोळी, तेवता दिवा,फुलांचा हार,नवे मडके,आवे अशी आरास मांडली जाते. सहपरीवार शेतात लक्ष्मी मातेची आराधना, आरतीसह पूजा करीत,धन धान्यांनी घरीदारी बरकत येऊ दे अशी लक्ष्मीमातेकडे याचना शेतकरी करतात. शेतकऱ्यांकडून अखेर जेवणावळीची पंगत अगदी भरपेट उठवली जाते. लहान मंडळींकडून अगदी धूम शेताशेताने चालल्याचे चित्र होते.काकडी,बोरे,उस,हरभरा टहाळी, वटाणे असा आस्वाद मुला मुलींसह जेष्ठ मंडळींकडून देखील घेण्यात येत होता.काही मुले पतंगबाजी करण्यात शिवारभर दंग होती. गूळ,तीळ शेंगदाणेपोळी,भात,खिचडा,भजे,वरण, भाजी,साजूक तूपाची धार आणि आंबिल असा गावराणी खमंग मेनू शेताशेताने गंधाळलेला होता. सहकुटुंब आणि मित्र परिवारासह हा सण ग्रामीण भागात साजरा होत असल्याने कृषी संस्कृतीतला हिरवाईचा हा परंपरेचा वारसा आजही मानवी जगण्याच्या धावपळीत तितक्याच आनंदात शाबूत आहे.

# खात्यामध्ये पैसे कधी जमा करणार ; शेतकऱ्यांचा संतापजनक प्रश्न?

## शासन म्हणते शेतकऱ्यांना ईकेवाईसी करा शेतकरी शासनाला म्हनतात ईकेवायसी केली !

तभा वृत्तसेवा
धर्माबाद,दि. १५ जानेवारी

धर्माबाद तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये शेतकऱ्यांच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने भरपाई पोटी अनुदान अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेले नाही. धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे वाटोळे होत असल्यामुळे गेल्या अतिवृष्टीचा कार्यकाळात शेतकऱ्यांच्या शेतातील मुसळधार पावसाने पिकाच्या अतोनात नुकसान झाले आणि प्रशासनाने झालेल्या अतिवृष्टी मध्ये शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या झालेल्या पिकाची नुकसान पंचनामे केले होते. त्याच अनुषंगाने शासन स्तरावरणातील नुकसानीचे रक्कम तालुक्यासाठी मंजूर झाल्याने सदरील अनुदान रक्कम डी.बी. टी.प्रणालीद्वारे आजही शेतकरी मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत आधार प्रमाणिकरण ईकेवायसी करून शेतकऱ्यांकडे पावती सुद्धा आहे पण अद्याप अनुदानाची रक्कम खात्यामध्ये जमा झाले नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे झालेल्या अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करण्यात आले अगदी अल्प शेतकऱ्यांचे व्हीके नंबर प्राप्त झाले असून उर्वरित बहुतांश शेतकरी आजही व्हीके नंबर अनुदान पासून वंचित ठेवल्या जात आहेत शेतकऱ्यांची माहिती अपलोड करून विके नंबर प्राप्त करून घेण्यासाठी शेतकरी दिसत आहेत धर्माबाद तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. अंगठा न येणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध योजनाची अनुदानाची रक्कम मिळणार का? असा सवाल धर्माबाद तालुक्यातून शेतकऱ्यांकडून संताप जनक प्रश्न? शासन म्हणते ई केवायसी करा शेतकरी म्हणतात ईकेवायसी केली खात्यामध्ये पैसे जमा करा शेतकऱ्यांनी ईकेवायसी केली पण गतिमान शासन शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे कधी जमा करणार असा संताप जनक प्रश्न? शासनाला धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यातून विचारण्यात येत आहे.

अंगठा न येणाऱ्या शेतकऱ्यांकडून गतिमान शासनाला संताप जनक प्रश्न? वारंवार चकरा मारत शेतकरी अनुदानापासून वंचित असताना दिसून येत आहेत तरीसुद्धा प्रशासन त्यावर तोडगा काढण्यासाठी कोणताही ठोस निर्णय घेत नसल्याने लवकरात लवकर अतिवृष्टी अनुदानाची रक्कम जमा करण्यात यावी शेतकऱ्यांकडून अशी मागणी होत आहे गोरगरीब जनसामान्य माणसासह शेतकऱ्यांतून मागणी केली जात आहे.

## भोकरमध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन

तभा वृत्तसेवा
भोकर,दि. १५ जानेवारी

जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान तर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.४ ते१९ जानेवारी पर्यंत रक्तदान महायज्ञाचे आयोजन महाराष्ट्रभर करण्यात आलेली आहे. त्याच अनुषंगाने भोकर तालुक्याच्या वतीने देखील गुरुवार दि.१६ जानेवारी रोजी तहसील कार्यालय भोकर समोर स. ८ ते सा. ७ पर्यंत महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या आपल्या महाराष्ट्रामध्ये सर्वत्र सिकलसेल, निमिया, हिमोफिलिया, थायलिसिमिया, ब्लड कॅन्सर फेलीवर रुग्ण जास्त आढळत असून अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढी यांना



रक्त बाटल्या देण्याचे आमच्या संप्रदायामार्फत निश्चित केले आहे. खालील ठिकाणी रक्तदान करण्यास येऊन सामाजिक कार्यात सहभागी व्हावे असे अवाहन तालूका अध्यक्ष श्री संप्रदाय भोकर गंगाधर पडवळे यांनी दिली आहे.

यावेळी सुशांत बारडे,सोमनाथ पांचाळ, संतोष वट्टमवार, राजू बंडावार, इरवंत पांचाळ विजय कापसे दत्ता डूरे संदिप बूट्टवाड आदींची उपस्थिती होती.

# जगाचा पोशिंदा शेतकऱ्यास कोणी वाली आहे का?

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. १५ जानेवारी

सद्या २१व्या शतकातही शेतकऱ्यांना हलाखीच्या परिस्थितीत जगावे लागणे ही भारतासाठी यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती असावी? देशाचा पोशिंदा व अन्नदाता आपल्या शेतीपर्यंत नीट चालत ही जाऊ शकत नसेल तर यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते असावे.



देगलुर तालुका व बिलोली तालुका सीमेवरून वाहणाऱ्या मन्याड नदीच्या दोन्ही बाजूला बिलोली तालुक्यातील गळेगाव व देगलूर तालुक्यातील वझरगा, तुपशेळगाव येथील शेतकऱ्यांची शेत जमीनी आहेत. शेतकऱ्यांना शेती कामे करण्यासाठी मन्याड नदीच्या पात्रातून जीव मुठीत धरून ये जा करावे लागत असल्याने या ठिकाणी शासनाने पुलाचे बांधकाम करावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून शासनाकडे केली जात आहे.

मण्याड नदी ही जेंव्हा बिलोली तालुक्यातील गळेगाव शिवारात व देगलूर तालुक्यातील वझरगा, तुपशेळगाव शिवारातून वाहते तेंव्हा बिलोली तालुक्यातील गळेगाव येथील बऱ्याच शेतकऱ्यांची जमीन ही मन्याड नदी पलीकडे देगलूर तालुक्यातील वझरगा व तुपशेळगाव शिवारालगत आहे. त्याच प्रमाणे देगलूर तालुक्यातील वझरगा व तुपशेळगाव येथील शेतकऱ्यांची बरीचशी शेतजमीन ही बिलोली तालुक्यातील गळेगाव शिवारात आहे. दोन्ही शिवारामध्ये मन्याड नदी पात्र असल्याने शेतकऱ्यांना त्या मन्याड नदीपात्रातुन शेत काम करण्यासाठी जीवमुठीत धरून पाण्यातून प्रवास करावा लागतो. त्यामुळे पाण्याचा प्रवाह अचानक पणे वाढल्यास शेतकऱ्यांना आपला जीव ही गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याठिकाणी शासनाने पुलाचे बांधकाम करून शेतकऱ्यांना ये जा करण्यासाठी रस्ता तयार करून द्यावा. अशी समस्त शेतकऱ्यांकडून शासनाकडे मागणी केली जात आहे.

**देशाच्या पोशिंद्यास केवळ मार्गक्रमण करण्यासाठी पुलाची व्यवस्था करण्यात यावी. यासंबंधीचे निवेदन ग्रामपंचायत कार्यालय वझरगा यांच्याकडून जिल्हाधिकारी नांदेड यांना नुकतेच देण्यात आले आहे.**

# मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेत तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
नायगांव,दि. १५ जानेवारी



मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेत इतर मागास बहुजन समाज कल्याण विभाग नांदेड यांच्या वतीने सांघीक तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोष्ट बेसिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील ग्रामीण भागातील तांड्यावरील विमुक्त जाती भटक्या जमाती मधील मुला-मुलींना शैक्षणिक क्षेत्रासह सांघिक क्रिडा क्षेत्रामध्ये पारा गंत व्हावे. क्रिडा क्षेत्रातून विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना वृध्दिंगत व्हावी.याअनुषंगाने इतर मागास बहूजन कल्याण(प्रादेशिक) विभाग लातूर व इतर मागास बहूजन समाज कल्याण विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने. जिल्ह्याती ल नायगांव, मुखेड, देगलूर, लोहा, चार तालुक्या तील सर्व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे दि. १६ जानेवारी रोजी गुरुवारी मरवाळी तांडा आश्रम शाळेतील भव्य प्रांगणात १४ व १७ या वयोगटातील मुलं-मुलीचे व्हॉलीबॉल, कबड्डी-कबड्डी, खो-खो या सारख्या सांघिक खेळा च्या तालूका स्तरीय क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या असून.

जिल्ह्यातील चारही तालुक्यातील सर्व आश्रम शाळेतील मूला मुलांनी तालुका स्तरीय खो खो , व्हॉलीबॉल, कबड्डी, या सांघिक क्रिडा स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या क्रिडा कौशल्य दाखववे. असे आवाहन मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेतील प्राचार्य विजय कुमार देशमुख व क्रीडा कमिटीने यावेळी केले आहे.

# पंचायत समिती समोर सेवानिवृत्त कर्मचार्याचे आमरण उपोषण

## सातव्या वेतन आयोगातील थकित रक्कम देण्याची मागणी



तभा वृत्तसेवा
नायगांव,दि. १५ जानेवारी

सातव्या वेतन आयोगातील थकित हप्ता मिळण्यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांचा नायगांव पंचायत समिती समोर आमरण उपोषणाला केली सुरुवात. सातव्या वेतन आयोगातील (तिस-या व चौथा) हाप्त्याचे बजेट ३१ मार्च २०२४ रोजी नायगांव तालुक्यातील पंचायत समितीला प्राप्त झाले असूनही. तालुक्यातील नरसी येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी अशोक गंगाधर पवळे व गंगाधर प्रभू देशमुख ह्या दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगातील तिसरा व चौथा हप्त्याचे असे दोन लाख अठ्ठेचाळीस हजार एवढ्या रक्कमे चे देयके काढण्यात यावे यासाठी मागील दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी नायगांव चे गटविकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांना लेखी निवेदन देऊन थकित बिल देयके काढण्यात यावे अशी मागणी केली होती. परंतु नायगांव येथील गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांनी चिरीमिरी मिळत नसल्यामुळे हेतू पुरस्सर थकित बिल देयके काढण्यास टाळा टाळ करीत असल्यामुळे.

अखेर जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी,कर्मचारी जेष्ठ नागरिक आसोसीएशन नांदेड व नायगांव तालुका शाखा यांच्या वतीने नरसीतील सेवानिवृत्त शिक्षक तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी अशोक गंगाधर, पवळे गंगाधर, प्रभू देशमुखांनी नायगांव पंचायत समितीच्या समोर दिनांक. १५ जानेवारी २०२५ पासून आमरण उपोषणा सुरुवात केली आहे. यावेळी अशोक गंगाधा प्रभु देशमुख यासह दिगांबर कोरे, माधव शिंदे, विठ्ठलराव वेळगे, प्रल्हाद कदम, गंगाधर माऊले, गोपाळ काशीटवार, देवीदास जाधव, गोविंद शिंदे, माधव येन्नावार आदी सेवानिवृत कर्मचारी या उपोषण स्थळी उपस्थित होते.

# धम्म परिषदेच्या समारोपास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणांची हजेरी

तभा वृत्तसेवा
अर्धापूर,दि. १५ जानेवारी

महाविहार बावरीनगर दाभड येथे सुरू असलेल्या धम्म परिषदेच्या समारोपास माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी मंगळवारी उपस्थिती लावली.भोकर मतदार संघातील दाभड येथील बावरीनगरच्या विकासासात माझा खारीचा वाटा आहे. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून भविष्यातही मी येथील विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

बावरीनगर येथे आयोजित धम्म परिषदेची सांगता मंगळवारी झाली. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले, मी तुमच्यातलाच एक भाविक म्हणून आलो आहे सर्व उपस्थितांना भिक्खू संघास माझा मानाचा जय भिम. जागतिक पातळीवर धम्माचा प्रसार प्रचाराचे कार्य होत असून सामाजिक



विचारवंतांचे व्यासपीठ आहे धम्म काय धम्माचे विचार काय भगवान बुद्धांचा विवेक, शांतीचा प्रसार होतो व डॉ. बाबासाहेबांची भावना या धम्म परिषदेतून पूर्ण होते. या ठिकाणी लाखोंचा जनसुमादा येतो सुंदर कार्यक्रम होतो येथे येणाऱ्या लोकांना सुंदर सुविधा उपलब्ध व्हाव्यात येथील विकसित कामासाठी मी कटिबद्ध आहे. माहाविहार बावरीनगर हा प्रकल्प गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेबांच्या आदर्शातुन होत आहे. या प्रकल्पासाठी मी कधीही कमी ठरणार नाही. यावेळी आ. अमर राजुरकर, सभापती संजय देशमुख लहानकर, आदींचा सत्कार महाविहर बावरीनगर संयोजक डॉ. एस. पी. गायकवाड व डॉ.आनंद सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भिक्खू संघ, सरपंच कांचन कुलदीप सूर्यवंशी, बालाजी गव्हाणे, राजेश लोणे, चंद्रमुणी लोणे, आनंद मोरे, उपसरपंच अरविंद पांचाळ आदींची यावेळी उपस्थिती होती.

# समाज कल्याण विभागामार्फत विभागीय क्रीडा स्पर्धा

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १५ जानेवारी

समाज कल्याण विभागांतर्गत नांदेड येथे दिनांक १७ व १८ रोजी सकाळी ८.०० वा. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ प्रांगणात समाज कल्याण अस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या विभागीय क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर विभागीय क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, नांदेड यांचे हस्ते करण्यात येणार आहे.

सदर क्रिडा स्पर्धा करिता समाज कल्याण विभागाती लातूर,उस्मानाबाद,हिंगोली नांदेड जिल्हयातील शासकीय मुला-मुलींचे निवासी शाळेतील विद्यार्थी -विद्यार्थीनी तसेच अधिकारी कर्मचारी हे सदर क्रिडा स्पर्धचे स्पर्धक रहणार आहेत. समाज कल्याण विभागीय क्रिडा स्पर्धा मध्ये आऊडोअर(क्रिकेट,खोखो,कबड्डी,व्हॉलीबॉल,थाळीफेक,रस्सीखेच, फुटबॉल) व इनडोअर क्रिडा स्पर्धा(बॅडमिंटन,टेबलटेनिस,बुध्दीबळ)घेण्यात येणार आहेत. सदर विभागीय क्रिडा स्पर्धा करिता शासकीय निवासी शाळा व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयातील सर्व विभागाचे संघ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. तसेच वैयक्तीक खेळामध्ये बुध्दीबळ स्पर्धा, १००मीटर धावणे स्पर्धा ,२०० मीटर धावणे ४०० मी.धावणे , लांब उडी, थाली फेक, या स्पर्धामध्ये महिला व पुरुष अधिकारी कर्मचारी यांचा सहभाग रहणार आहे अशी माहिती शिवानंद मिनगीरे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांनी दिली आहे.

# श्याम कोकाटे यांनी घेतली शिवसेना संपर्कप्रमुखांची भेट

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १५ जानेवारी

शिवसेनेचे सचिव संजय मोरे आणि संपर्कप्रमुख आनंद जाधव यांची श्याम कोकाटे यांनी मुंबईत सदिच्छा भेट घेतली. ही भेट नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आ. बालाजी कल्याणकर यांनी कडून आणली.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आ.बालाजी कल्याणकर यांच्या नेतृत्वात शाम कोकाटे आणि शिवसेनेत जाहीर प्रवेश केला होता. जाहीर प्रवेशानंतर आ. बालाजी कल्याणकर यांच्या विजयासाठी यांनी प्रामाणिकपणे काम केले. सांगवी प्रभागातून शिवसेनेला सर्वाधिक मताधिक्य मिळवून देण्याचे



काम श्याम कोकाटे यांनी केले आहे. कोकाटे यांनी अत्यंत कमी वेळात परंतु सांगवी प्रभागातील जुन्या आणि नव्या मतदारांची सांगड घालत शिवसेनेचा गड कायम राखण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. त्यामुळे आ. बालाजी कल्याणकर यांच्या मार्गदर्शनात श्याम कोकाटे यांची शिवसेनेतील वाटचाल उत्तमरित्या सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आ. बालाजी कल्याणकर यांनी शाम कोकाटे यांची मुंबईत शिवसेनेचे सचिव संजय मोरे आणि संपर्कप्रमुख आनंद जाधव यांची सदिच्छा भेट घडवून आणली. या भेटीत श्याम कोकाटे यांनी केलेल्या कार्याची स्तुती आ. कल्याणकर यांनी यावेळी केली. आगामी काळात श्याम कोकाटे यांच्या खांद्यावर पक्ष निश्चितपणे मोठी जबाबदारी सोपवेल असा विश्वास शिवसेनेचे सचिव संजय मोरे आणि संपर्कप्रमुख आनंद जाधव यांनी यावेळी व्यक्त केला.